


# मेहता मराठी ग्रंथजगत

मे, २०१८ • पृष्ठे १०० • किंमत : ₹ १५
• वर्ष अठरावे • अंक पाचवा

## आवर्जून वाचावे















कोवाड येथे **युवा ग्रामीण साहित्य संमेलन** नुकतेच पार पडले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता यांना या संमेलनात मानपत्र देऊन गौरवण्यात आले. पारू नाईक यांच्या हस्ते मानपत्र स्वीकारताना अनिल मेहता.





**'तिनका तिनका तिहार'** या हिंदी काव्यसंग्रहाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन नुकतेच येरवडा मध्यवर्ती कारागृहात करण्यात आले. या प्रसंगी लेखिका वर्तिका नंदा, अनुवादक मंजिरी धामणकर, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अखिल मेहता, रूपा मेहता, कारागृहाचे महानिरीक्षक डॉ. भूषणकुमार उपाध्याय, येरवडा कारागृहाचे अधीक्षक यू. टी. पवार आदी उपस्थित होते. याच कार्यक्रमात यू. टी. पवार यांना पुस्तकं भेट देताना रूपा मेहता.




# मेहता मराठी ग्रंथजगत

। मे २०१८ । वर्ष अठरावे । अंक पाचवा ।



**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक

सुनील मेहता,

१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,

बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,

पुणे - ४११ ०३०

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १० |
| **पुरस्कार** | १८ |
| **उपक्रम** | २२ |
| **पुस्तक परिचय** | |
| **गरुडजन्माची कथा** | ३० |
| **समादचा वाळवंटातील व रानातील फेरफटका** | ४० |
| **बालकथा** | |
| **चिमणी** | ५० |
| **जादूचं खीरपात्र** | ५६ |
| **फ्रँकलिन व पाळीव प्राणी** | ६० |
| **बुद्धिरामाचा न्याय** | ६४ |
| **सेनापतीची निवड** | ७० |
| **बालनाटिका** | ७४ |
| **शब्द शब्द जपून ठेव...** | ७८ |
| **स्मरण** | ८४ |
| **अभिप्राय** | ९४ |
| **बालनगरी** | ९६ |



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.



## संपादकीय

# बालसाहित्याचा झुळझुळता निर्झर

मराठीमध्ये बालसाहित्याची निर्मिती विपुलतेने आणि वैविध्यपूर्णतेने झाली आहे. मग ती बालगटासाठी असेल, कुमार गटासाठी असेल. कथा (लोककथा, चातुर्यकथा, परीकथा, बोधकथा इ.), कविता, बडबडगीतं, नाटकं, नाटुकली, नाट्यछटा, कादंबऱ्या (संख्या कमी असेल) इ. आमचं बालसाहित्याचं दालन न्याहाळताना मराठी बालसाहित्यात भर घातल्याचा आणि वैविध्यही जपल्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. आमचं बालसाहित्याचं दालन बहुतांशाने कथांनी सजलेलं असलं, तरी त्या कथांमध्येही विविधता आहे. जसे चित्रमय रंगतदार कथा, आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा, गुरू-शिष्य कथा, जंगल कथा, संस्कारक्षम कथा इ. त्याचबरोबर विविध कथामालिका हे तर आमचं वैशिष्ट्यच आहे. ज्या कथांनी प्रत्येक बाल पिढीला भुरळ घातली, अशा विक्रम-वेताळ, बिरबल, तेनालीराम, हितोपदेश, जातक कथांसारख्या मालिकांची निर्मिती तर आम्ही केलीच; पण ससोबा-हसोबा मालिका, छोटुशा बब्बडच्या गमतीदार गोष्टी यांसारख्या नावीन्यपूर्ण मालिकांची मेजवानी आम्ही बाल वाचकांना दिली. रा. वा. शेवडे गुरुजींनी एकवीस लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांची लिहिलेली छोटेखानी चरित्रं आम्ही मालिका रूपाने बाल-कुमार वाचकांच्या सुपूर्द केली. फ्रँकलिन आणि एल्मर या अनुवादित मालिकाही आम्ही बालदोस्तांच्या भेटीला आणल्या आणि कांगारू देशीच्या गोष्टी ही अनुवादित मालिका आम्ही नुकतीच प्रकाशित केली आहे. याबरोबरच गंमत कोडी हा संच, आपली सृष्टी हा प्राणी आणि पक्ष्यांची सचित्र माहिती देणारा संच, विज्ञान नवलाई हा सहा विषयांवरील संच प्रकाशित करून आम्ही बाल दोस्तांसमोर ज्ञान आणि माहितीचा खजिनाही खुला केला आहे आणि गंमत कोड्यांच्या निमित्ताने



त्यांच्या बुद्धीला चालना देण्याचाही प्रयत्न केला आहे.

आमच्या बालसाहित्याच्या दालनात आपण डोकावलोच आहोत तर बालवाङ्मयाच्या संदर्भात थोडीशी चर्चा करायला काय हरकत आहे? ही चर्चा करताना कथा या प्रकाराला प्राधान्य मिळणं स्वाभाविक आहे. कथा... मग त्या लोककथा असतील, जातककथा असतील, पौराणिक किंवा इसापनीतीतील कथा असतील, आपल्याकडे मौखिक परंपरेने चालत आल्या आहेत. या कथा सांगण्यामागचं प्रयोजन होतं, बालमनावर मनोरंजनाच्या माध्यमातून संस्कार करणं आणि हेच प्रयोजन नंतर त्या छापील स्वरूपात आणण्यातही होतं; पण मराठीत निर्माण झालेलं विपुल बालवाङ्मय वाचताना एक प्रश्न नेहमी मनात उभा राहतो, बालवाङ्मय निर्मितीमागच्या प्रेरणा काय असतील? जाणकारांकडे याचं उत्तर असेलही.

परीकथा, राजाराणीच्या कथा या अद्भुतरम्य कथा असतात. बालवाङ्मयेतर साहित्यामध्ये जीवनाचं वास्तव दर्शन घडविणारं साहित्य हे सर्वश्रेष्ठ समजलं जातं. मग मुलांना आपण लहानपणीच अद्भुतरम्य वातावरणात का घेऊन जातो? तर परीच्या गोष्टीतही दुष्ट शक्ती असतातच. ज्याला या दुष्ट शक्ती त्रास देतात, त्याची सुटका परी करते, असं साधारण परीकथांचं सूत्र असतं. मग या कथा वाचून मुलांचं फक्त मनोरंजन व्हावं येवढाच हेतू असतो का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल; कारण अडचणीत सापडलेल्या कुणालाही मदत करण्याचा संदेश परीच्या माध्यमातून मिळतो. परीकडे असलेल्या अलौकिकत्वाचा उपयोग ती समाजासाठी करते, ही बाबही त्यातून अधोरेखित होते. तिची सुंदरता ही प्रतीकात्मक असते. त्यातूनही एक संदेश मिळतो, तो असा - जीवनात जे चांगलं आहे, उदात्त आहे, मंगल आहे ते सुंदर आहे. अशा गोष्टीतील दुष्ट शक्तींच्या माध्यमातून मुलांना हे समजावं, की जगात वाईट गोष्टीही आहेत आणि त्यांच्या प्रतिकारासाठी कुठेतरी आतापासूनच मनाची तयारी व्हायला हवी.

राजकन्येला प्राप्त करण्यासाठी दूर, राक्षसांच्या किंवा दुष्ट शक्तींच्या पहाऱ्यात असलेली एखादी वस्तू आणण्यासाठी एखादा राजपुत्र किंवा एखादा सामान्य तरुणही जायला निघतो; पण वाटेत त्याला असंख्य असे अवघड अडथळे पार करावे लागतात. म्हणजे त्याचं त्या वस्तूपर्यंत पोहोचून



ती वस्तू घेऊन परत येणं म्हणजे जिवाशीच खेळ असतो; पण तरीही केवळ राजकन्येला प्राप्त करण्यासाठी तो ते आव्हान समर्थपणे पार पाडतो, असंही थोड्याफार फरकाने काही बालकथांचं सूत्र असतं. इथेही राजपुत्र, राजकन्या प्रतीकात्मक आहेत. आपल्या ध्येयापर्यंत पोहोचताना वाटेत कितीही अवघड आव्हानं समोर ठाकली तरी त्यांना नेटाने तोंड देऊन ध्येयप्राप्तीपर्यंत पोहोचायचं असतं, असा संदेश अशा कथांमध्ये लपलेला असतो.

राजाची आवडती राणी-नावडती राणी अशाही कथा असतात. त्यात नावडती राणी आपल्या गुणांनी राजाला जिंकून घेते. म्हणजे आपल्या गुणांनी दुसऱ्याला जिंकून घ्या, असा संदेश अशा कथांमध्ये असतो. बिरबल, तेनालीराम यांच्या कथा चातुर्य आणि हजरजबाबीपणाचा वस्तुपाठ देतात. एकूण, बालवाङ्मय मनोरंजनातून बोधाकडे वाटचाल करत असतं.

आणखी एक प्रश्न असतो. बालवाङ्मयाच्या संख्यात्मकतेकडे नेहमीच लक्ष दिलं जातं. त्याच्या गुणात्मकतेची फारशी चर्चा होताना दिसत नाही. थोडक्यात, बालवाङ्मयाची समीक्षा व्हावी की नाही, या प्रश्नाचं एक उत्तर असं असू शकतं, की बालवाङ्मयात मनावर फार ताण येईल किंवा जीवनातील वास्तव रखरखीतपणे समोर येईल, असं काही नसतं. किंबहुना, ते तसं नसावं हा संकेत आहे; कारण या वाङ्मयातूनही मुलांच्या मनाची कोवळीक जपायची असते आणि ती जपता जपता त्याच्या मनाची मशागत करायची असते. त्यामुळे बालसाहित्य हे एखाद्या झुळझुळत्या निर्झरासारखं वाटतं. त्या झुळझुळत्या निर्झराला समीक्षेची फूटपट्टी कशाला? नाही का?





# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

---

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**



# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books I Toys I Stationery I Music I Movies I Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८०८

---

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse




**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon    Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online पुस्तके खरेदी करा** **www.mehtapublishinghouse.com**



# साहित्यवार्ता

## कोवाड येथे युवा ग्रामीण साहित्य संमेलन पार पडले

कोवाड येथे युवा ग्रामीण साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. रणजित देसाई यांची नव्वदावी जयंती आणि 'श्रीमान योगी' कादंबरीला पन्नास वर्षं पूर्ण होत आल्यानिमित्त पद्मश्री रणजित देसाई वाचनालयाच्या वतीने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. 'जडणघडण' मासिकाचे संपादक डॉ. सागर देशपांडे संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. वाचकांची गावे निर्माण होण्याची अपेक्षा त्यांनी अध्यक्षपदावरून बोलताना व्यक्त केली. या संमेलनात काव्यवाचन, चर्चासत्र, शिवचरित्रावरील व्याख्यान, मिलिंद इंगळे यांचं गायन इ. कार्यक्रम सादर करण्यात आले. तसेच 'श्रीमान योगी' या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता यांना या संमेलनात मानपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच रणजित देसाईंचे लेखनिक पांडुरंग कुंभार यांनाही मानपत्र देण्यात आले. या संमेलनाला संपादक किरण ठाकूर, ज्येष्ठ साहित्यिक सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता, पारू नाईक, माजी राज्यमंत्री भरमूअण्णा पाटील, संजय मंडलिक, अंबरीश घाटगे, संग्रामसिंह कुपेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'तिनका तिनका तिहार' या पुस्तकाचे प्रकाशन

'तिनका तिनका तिहार' या हिंदी काव्यसंग्रहाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन नुकतेच येरवडा मध्यवर्ती कारागृहात करण्यात आले. या वेळी पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका वर्तिका नंदा, कारागृहाचे महानिरीक्षक डॉ. भूषणकूमार उपाध्याय, उपमहानिरीक्षक स्वाती साठे,

येरवडा कारागृहाचे अधीक्षक यू. टी. पवार, पुस्तकाच्या अनुवादक मंजिरी धामणकर, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अखिल मेहता, रूपा मेहता आदी उपस्थित होते.

'तिनका तिनका तिहार'च्या संकल्पनेबद्दल बोलताना वर्तिका नंदा म्हणाल्या, ''मी गुन्हेगारी संदर्भातील वृत्तांकन करण्यासाठी तिहार तुरुंगात गेले, त्या वेळी तेथील महिलांचे जीवन पाहून मनाला चटका बसला. या महिलांसाठी काहीतरी करावे, यासाठी 'तिनका तिनका तिहार' ही चळवळ सुरू केली. त्यातूनच कवितांची संकल्पना सुचली. महिला कैद्यांकडेही प्रतिभा आहे, हे या प्रयोगातून जाणवले. त्यांच्या कविता संकलित करून त्या पुस्तकाच्या माध्यमातून जगासमोर आणल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावरही या प्रयोगाची दखल घेण्यात आली आहे.''

''छोटी चूक माणसाला जन्मभर शिक्षा भोगण्यास भाग पाडते. प्रत्येकामध्ये कला असून, ती जोपासावी. कोणीही वाईट नसतो. मात्र, परिस्थिती तशी वेळ निर्माण करते,'' असे डॉ. उपाध्याय यांनी सांगितले.

कार्यक्रमात बंदींपैकी काही बंदिवानांनी या प्रकाशित पुस्तकातील कविता सादर केल्या. तर एका बंदिवानाने गाणे सादर केले. बंदिवानाने बनवलेली भेट लेखिका वर्तिका नंदा यांना देण्यात आली. स्वाती साठे यांनी स्वागत केले. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपादक योजना यादव यांनी सूत्रसंचालन केले. यू. टी. पवार यांनी आभार मानले.

## 'मी, संपत पाल, गुलाबी साडीवाली रणरागिणी' या पुस्तकाचे प्रकाशन

उत्तर प्रदेशातील बुंदेलखंडाचा भाग. एका मागासलेल्या जमातीत जन्मलेली... आणि शाळा न शिकलेली 'संपत' नावाची मुलगी वयाच्या १२व्या वर्षी विवाह होऊन सासरी जाते... भारतातल्या सरासरी कुठल्याही पारंपरिक घरात दिसते तसेच पितृसत्ताक आणि त्यातही 'सासूसत्ताक' वातावरण तिच्याही घरी... सासू-सत्तेचे चटके 'संपत'सुद्धा सहन करू लागते... एके दिवशी तिचाही कडेलोट होतो आणि स्वत:च्या हक्कांसाठी, स्वत:च्या अस्तित्वासाठी ती उद्रेकाचे हत्यार उपसते... इथूनच रोवले जाते ते



‘गुलाबी गँग’ नावाचे एका थराराचे बीज... आणि ते बीज रोवणारी असते ती एव्हाना बुंदेलखंडातून जगभर जिचे नाव जाऊन पोहोचलेय अशी गुलाबी साडीतली रणरागिणी संपतदेवी पाल नावाची धाडसी महिला...

या धाडसी महिलेच्या या धाडसी प्रवासाची कहाणी तिने स्वत:च उलगडली आहे, ‘मी, संपत पाल, गुलाबी साडीवाली रणरागिणी’ या आत्मकथनातून. या आत्मकथनाचं नुकतंच एका समारंभात प्रकाशन करण्यात आलं. त्यावेळी मेहता पब्लिशिंग हाऊसचे अखिल मेहता आणि संपादक योजना यादव संपत पाल यांच्यासह उपस्थित होते.

एका भरगच्च सत्रात पाल यांच्याशी सचिन पवार यांनी संवाद साधला, त्यावेळी त्यांना खास ऐकायला उपस्थित तरुणांच्या गर्दीने या महिलेचा आजवरचा अविश्वसनीय असा प्रवास अनुभवला. त्यांच्या ‘जो अधिकारी गुंडा है, तो हाथ हमारे डंडा है... जो अधिकारी न्यायी है, वह ही हमारा भाई है... गुलाबी गँग झिंदाबाद’ यासारख्या घोषणांनी आणि ‘जागो जागो रे, भारत की नारी, जमाना आया जागन का’ अशा बुंदेलखंडी गीतांनी ही रंजक आणि तेवढीच गंभीर मुलाखत उत्तरोत्तर रंगत गेली.

## रिचटोपियाच्या प्रभावशाली लेखकांच्या यादीत किरण बेदींचा समावेश

रिचटोपिया या आंतरराष्ट्रीय लेखन मूल्यांकन व्यासपीठाने जगभरातील दोनशे प्रभावशाली लेखकांची यादी जाहीर केली आहे. त्यात किरण बेदी आणि शोभा डे यांचा समावेश आहे. त्याचबरोबर पाउलो कोएलो, महेश भट, अनुपम खेर आदींचा या यादीत समावेश आहे. किरण बेदींची आठ पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने अनुवादित स्वरूपात प्रकाशित केली आहेत. ‘Be The Change भ्रष्टाचाराशी लढा’ हे त्यांचे सुप्रिया वकील अनुवादित पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने नुकतेच प्रकाशित केले आहे. ‘आय डेअर’ या त्यांच्या सुप्रिया वकील अनुवादित आत्मचरित्राला १९९६ सालचा राज्य पुरस्कार प्राप्त झाला होता. शोभा डे यांचे ‘सिलेक्टिव्ह मेमरी’ हे अपर्णा वेलणकर अनुवादित आत्मकथन मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहे.



२ री आवृत्ती




# सर्पाचा सूड

## महाभारतातील न ऐकलेल्या कथा

लेखक
**सुधा मूर्ती**

अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत : २००/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

अर्जुनाची एकूण नावे किती?
यमाला शाप का मिळाला?
लहानशा मुंगसाने युधिष्ठिराला कोणता धडा शिकविला?
महाभारतामध्ये कुरुक्षेत्री जे घनघोर युद्ध झालं, त्यात अखेर देवदेवतांनासुद्धा कोणत्या ना कोणत्या पक्षाची बाजू घेणं भाग पडलं.
युद्धाविषयी तर पुष्कळ माहिती सर्वत्र उपलब्ध आहे; परंतु या युद्धाच्या आधी, युद्धाच्या दरम्यान किंवा युद्धाच्या नंतर असंख्य कथा घडल्या आहेत.
या कथांमुळेच महाभारताला रंग भरतो.
या कथासंग्रहांमधून अनेक पुरस्कार प्राप्त केलेल्या लेखिका सुधा मूर्ती भारताच्या या महाकाव्याचं विस्मयकारी जग वाचकांपुढे खुलं करतात. या संग्रहाद्वारे त्यांनी सांगितलेल्या गोष्टी सर्वश्रुत नसल्यामुळेच त्यांचं हे वेगळेपण वाचकाला मंत्रमुग्ध करतं.



### पुस्तकांच्या गावात साहित्य, संगीताची सुरेल गुंफण...

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून ‘पुस्तकांचं गाव’ भिलार येथे वाग्मि एन्टरटेनमेन्ट प्रस्तुत ‘अमृताचिये मराठी’ या सुरेल मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ दिग्दर्शक व लेखक पुरुषोत्तम बर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत केतन अत्रे व विद्या करलगीकर यांनी हा आशयगर्भ कार्यक्रम रसिकांसमोर सादर केला.

या कार्यक्रमाचा प्रारंभ सतंश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांच्या ‘अवचिता परिमळू’ या अभंगाने झाला. भा. रा. तांबे, कुसुमाग्रज, गदिमा, सुधीर मोघे, जगदीश खेबूडकर, आरती प्रभू आदी कवींच्या कवितांची झालेली सुरेल गाणी सादर करण्यात आली. तसेच या गाण्यांच्या अनेक आठवणी पुरुषोत्तम बेर्डे यांनी या प्रसंगी उलगडून सांगितल्या. विवेक परांजपे, राजेंद्र हसबनीस, प्रसन्न बाम, निलेश देशपांडे, ऋतुराज कोरे यांनी अनुरूप साथसंगत केली. विनया देसाई यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

साहित्यातील कविता हा अत्यंत लोकप्रिय प्रकार आहे. मराठी साहित्यात कवितांचे स्थान अढळ आहे. मराठी सारस्वतांच्या अनेक मोहक कवितांना दिग्गज संगीतकारांनी चाली लावल्या आहेत. मराठी भाषेची स्थित्यंतरे दर्शविणारी अशी अनेक गाणी घेऊन मृण्मयी अत्रे यांनी ‘अमृताचिये मराठी’ या कार्यक्रमाची निर्मिती केली.

पुणे, सातारा, सांगली, महाबळेश्वर, वाई, पाचगणी अशा विविध ठिकाणांहून या कार्यक्रमास रसिक उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नयनरम्य निसर्ग व कलत्या संध्याकाळी पक्ष्यांच्या किलबिलाटात संपूर्ण वातावरण संगीतमय झाले होते. या कार्यक्रमाला श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

पुस्तकांच्या गावात नियमितपणे होत असलेल्या अशा साहित्यिक-सांस्कृतिक उपक्रमांबाबत उपस्थित रसिकांनी खूप समाधान व्यक्त केले. या मैफिलीला भिलार परिसरातील नागरिकांनीही मोठी गर्दी केली होती. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्रातील विविध विभागांत बारा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



### साहित्य महामंडळाच्या शिष्टमंडळाचे भाषा विकासासाठी निवेदन

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या शिष्टमंडळाने मराठी भाषेचा विकास व संवर्धनाच्या दृष्टीने विविध धोरण विकास आणि उपाययोजनांचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठी भाषामंत्री विनोद तावडे यांना सादर केले. यावेळी झालेल्या चर्चेत पहिली ते बारावीपर्यंत मराठी हा विषय सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये अनिवार्य करण्यासाठी कायदा करणे आवश्यक झाले आहे.

या कायद्यामुळे मराठी भाषा ही शासन व लोकव्यवहाराची भाषा म्हणून नावाजली जाईल. तसेच शासन-प्रशासनाबरोबर सर्वच सार्वजनिक संस्थांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर होण्यासाठी 'मराठी भाषा विकास प्राधिकरण' प्रस्थापित करणे आवश्यक आहे, असे महत्त्वपूर्ण मुद्दे अधोरेखित करण्यात आले.

याबाबत तातडीने तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना मराठी भाषामंत्री विनोद तावडे यांनी मराठी भाषा विभागाच्या सचिवांना दिल्या. त्याचबरोबर, मराठी भाषा विभागाचे कामकाज अधिक प्रभावी होण्यासाठी मराठी भाषेतील तज्ज्ञ व्यक्तींची तीन ते पाच वर्षांसाठी संचालक म्हणून नेमणूक करावी. मराठी भाषा विभागासाठी टप्प्याटप्प्याने १०० कोटी रुपयांची तरतूद करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, प्रत्येक तालुक्यात एक सांस्कृतिक संकुल उभारावे, याविषयी विस्तृत चर्चा झाली.

बडोदा येथील ९१व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्रीपाद जोशी, मुंबई साहित्य संघाच्या अध्यक्षा उषा तांबे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. मिलिंद जोशी यांच्या शिष्टमंडळासमवेत मराठी भाषा विभागाचे सचिव भूषण गगराणी या बैठकीस उपस्थित होते.

महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा सांगणाऱ्या मराठी साहित्याच्या संवर्धनासाठी, विकासासाठी सरकार कटिबद्ध आहे, असे आश्वासन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळासोबत झालेल्या बैठकीत प्रतिनिधींना देण्यात आले.



**ज्येष्ठ समीक्षक आणि मेहता मराठी ग्रंथजगतचे कार्यकारी संपादक शंकर सारडा यांना बालकुमार साहित्य संस्थेतर्फे जीवनगौरव पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. त्या अनुषंगाने त्यांनी ‘लोकमत’मधील ‘संवाद’अंतर्गत बालसाहित्याविषयी प्रकट केलेले विचार**

**हॅरी पॉटरसारखे स्वतंत्र लेखन होण्याची गरज**

**शंकर सारडा** : ज्या वेळी बालकुमार साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होतो तेव्हा एका परिसंवादात बालकथा लिहिणाऱ्या लेखकालाही एक लाख रुपये मिळायला हरकत नाही, असे विधान मी केले होते, तेव्हा गोपीनाथ तळवलकर म्हणाले होते, की तोंडाला येईल ते काय बरळतो आहेस? बालसाहित्याला कधी एवढा मोबदला मिळेल का? पण ‘हॅरी पॉटर’ने त्या शंकेला चोख असे उत्तर दिले, याचा मनापासून आनंद झाला. चांगली कथा आणि उत्तम लेखनक्षमता असेल तर जगभरातील वाचकांकडून त्या साहित्यकृतीची दखल घेतली जातेच. आपल्याकडे मराठी बालवाङ्मयाबाबत एक ढोबळ विधान केले जाते. एका ठराविक चाकोरीमधून आतापर्यंत बालवाङ्मय प्रकाशित झालेले आहे. त्यामध्ये पौराणिक, ऐतिहासिक किंवा अनुवादित वाङ्मयाचाच समावेश अधिकतर आहे. भा.रा.भागवत किंवा टिळक यांनी बरेच अनुवादित साहित्य मराठीत आणले. त्यामुळे ‘फास्टर फेणे’ किंवा ‘गोट्या’नंतर विशिष्ट पात्र किंवा जीवनानुभूतीवर स्वतंत्र असे लेखन मराठीत झालेले नाही. ते होण्याची गरज आहे. केवळ लहानच नव्हे, तर तरुण आणि प्रौढवर्गही वाचू शकेल, असे साहित्य निर्माण व्हायला हवे. कल्पनाविश्व विस्तारित एका अद्‌भुत विश्वाची सैर घडविणारे ‘हॅरी पॉटर’ हे पुस्तक हे याचे बोलके उदाहरण म्हणावे लागेल. या पुस्तकाचे सात ते आठ खंड प्रकाशित झाले. जगभरातील वाचकांना या पुस्तकाने वेड लावले. या पुस्तकावर चित्रपटाची निर्मिती झाली. त्यावर कॉमिक्स, थीमपार्क तयार झाले. मराठी लेखकांनी देखील या धर्तीवर लेखन केले पाहिजे. तसे झाले तर मराठी बालसाहित्याची जागतिक पातळीवर दखल घेतली जाईल आणि इतर भाषांमध्येही पुस्तकाचा अनुवाद होऊ शकेल.

मराठी बालवाङ्मयाच्या प्रारंभीच्या काळाचा आढावा घेतला तर संस्कृतमधून साहित्य अनुवादित करण्याचे प्रमाण अधिक होते. मुलांच्या



अभ्यासाला पूरक असे वाङ्मय देणे हे पालकांना अधिक सोयीचे वाटायचे. मुलांना ज्ञान देण्यासाठी लेखन करायचे. अभ्यासाव्यतिरिक्त इतर पुस्तके असावीत, असे मानले जात नव्हते. मुले इतर पुस्तके वाचायला लागली, की अभ्यासाचा वेळ जातोय म्हणून पालक रागवायचे. त्यामुळे मराठीत बालवाङ्मयाचे प्रमाण 'नाही'च्याच घरात होते. माहितीपूर्ण, विज्ञानविषयक पुस्तके देखील निर्मित होण्याची संख्या कमीच होती. मात्र जेव्हा बालबोध मेळावा झाला तेव्हा अभ्यासाव्यतिरिक्त इतर पुस्तके वाचण्याची जाणीव पालकांना व लोकांना झाली. सोळापानी मासिक पुस्तिका किंवा अंक काढले जायचे. त्यामध्येही धार्मिक पुस्तकांनाच अधिक महत्त्व असायचे. ही पुस्तके वाचताना अर्धवट सोडली तर पाप लागेल, असे लोकांना वाटायचे. नैतिक संस्कार जपले जायचे. वा.गो. आपटे यांनी 'आनंद' सुरू केले. मुलांकरीता साहित्यनिर्मिती होऊ लागली. त्यांनी 'मंगळावरची स्वारी'मधून नवीन जगाची ओळख नसलेल्यांना अद्भुत विश्वाची सफर घडविली. विज्ञानाची माहिती पहिल्यांदा मराठी बालवाङ्मयातून समोर आली. जाणिवेच्या कक्षा रुंदावत गेल्या. बालवाङ्मयाला व्यापक क्षेत्र मिळाले. त्यानंतर बालवाङ्मयात कथांवर आधारित बरीच पुस्तके यायला लागली. नवीन लेखक उदयास आले. मुलेदेखील कथेचा विषय बनू शकतात, याची प्रचिती आली. प्रौढसाहित्यामध्येही नवनवे प्रयोग व्हायला लागले. एक वाचक आणि लेखकवर्ग तयार होत गेला. १९२०पर्यंत ही स्थिती होती. त्यानंतर ना. सी.फडके यांचा काळ आला. मराठी भाषेत प्रेमाची अभिव्यक्ती करणारी भाषा त्यांनी विकसित केली. त्यामुळे लेखनाला नवीन आयाम मिळत गेले आणि कथा, कादंबरीच्या लेखनामधून वाचनाची भूक वाढत गेली.

❖

# पुरस्कार

## मेहता मराठी ग्रंथजगतच्या दिवाळी अंकाला पुरस्कार

मेहता मराठी ग्रंथजगतच्या २०१७च्या दिवाळी अंकाला स्व. सौ. कमलाबाई रसिकलाल धारिवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक (स्पर्धा) पुरस्कार मिळाला. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ९१व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. लक्ष्मीकांत देशमुख यांच्यासह ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे, दिनमार्क पब्लिकेशनचे दिनकर शिलेदार या वेळी उपस्थित होते. दिनमार्क पब्लिकेशनच्या संकल्पनेतून साकारलेल्या या दिवाळी अंक स्पर्धेचे आणि पुरस्कारांचे हे दुसरे वर्ष होते. लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या भाषणात कादंबरी या प्रकाराकडे दिवाळी अंकांचे दुर्लक्ष होत आहे, या मुद्द्याकडे लक्ष वेधले. तर भारत सासणे यांनी दिवाळी अंकांतील व्यंगचित्रांचं प्रमाण कमी झाले असल्याचे सांगितले आणि विज्ञानकथांकडे दिवाळी अंक लक्ष पुरवत नाहीत, असे निरीक्षण नोंदवले. भारत सासणे यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.



## ‘अफलातून मेंदू’ विज्ञान मित्र पुरस्काराने सन्मानित

मेंदूच्या अफाट कार्याचे कोडे उलगडणाऱ्या डॉ. अनिल गांधी यांच्या मराठीतील ‘अफलातून मेंदू’ या पुस्तकाला यंदाच्या ‘विज्ञान मित्र’ ग्रंथश्रेष्ठता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संत साहित्याचे अभ्यासक विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते हा पुरस्कार डॉ. अनिल गांधी यांना प्रदान करण्यात आला.

पुण्यातील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स येथे नुकताच हा पुरस्कार सोहळा पार पडला. स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्यूच्या वतीने डॉ. प्र.न. जोशी ‘विज्ञान मित्र’ ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार मेहता पब्लिशिंग हाऊसद्वारा प्रकाशित ‘अफलातून मेंदू’ला देण्यात आला. अथांग व अगाध मेंदूचा आपल्या संवादी शैलीत वेध घेण्याचे काम डॉ.गांधी यांनी या पुस्तकातून केले आहे. मेंदूचा उत्क्रांतीचा प्रवास वाचकांना समजेल अशा सोप्या शैलीत मांडला आहे. कानाने माणूस कसा पाहतो, चेहरा आंधळा म्हणजे काय, गती आंधळा म्हणजे काय, अशा काही गमतीदार शब्दांत कोडे उलगडले असल्यामुळे, या वेगळ्या पुस्तकाला पुरस्कार मिळाला.



## उमा कुलकर्णी आणि योजना यादव यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार

मंगळवेढा : ज्येष्ठ अनुवादक/लेखिका उमा कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपादक आणि कवयित्री योजना यादव यांना नुकतेच



मंगळवेढा साहित्य परिषदेच्या वतीने पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. उमा कुलकर्णींच्या ‘संवादु अनुवादु’ या आत्मकथनास सर्वोत्कृष्ट आत्मकथन आणि योजना यादव यांच्या ‘मरी मरी जाय सरीर’ या काव्यसंग्रहास सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार प्राप्त झाला.



महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मंगळवेढा शाखेच्या वतीने आयोजित आणि धनश्री परिवार, वारी परिवार, जगदंब परिवाराच्या संयुक्त विद्यमाने माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे याच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना शिंदे म्हणाले ‘‘क्रातिंकारकांचं काम आपण करू शकत नाही; पण साहित्यिक ते करत असतात. ग्रामीण भागातील लेखक नवी प्रतिभा घेऊन पुढं येतो आहे. महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीदिनी महाराष्ट्रातील आणि मंगळवेढा परिसरातील लेखकांचा सन्मान होतोय ही खूप आनंदाची गोष्ट आहे.’’

यावेळी ॲड. वसंत करंदीकर, ज्ञानदेव जावीर, मच्छिंद्र भोसले, हजरत काझी, प्रा. अकबर मुलाणी, श्रीरंग काटे, दऱ्याप्पा दत्तू, नगरसेवक प्रवीण खबतोडे, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण नामणे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक कवी इंद्रजित घुले यांनी केले. सूत्रसंचालन सोलापूर आकाशवाणीचे निवेदक संतोष पवार यांनी केले, तर आभार अध्यक्ष सुरेश पवार यांनी मानले. मसाप शाखा मंगळवेढा सदस्य, धनश्री परिवार, जगदंब परिवार आणि वारी परिवाराने कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

❖



**नवं कोरं**

# समादच्या वाळवंटातील व रानातील फेरफटका




लेखक
**मोहम्मद उमर**

अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत : ८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

समादला बाहेर भटकायला जाण्याची भारी हौस.
एक अख्खा दिवस वाळवंटात भटकंती करायची,
ओॲसिसमधल्या जलाशयात मनमुराद पोहायचं,
किंवा एखाद्या रानात जाऊन तिथल्या प्राण्यांना भेटायचं,
झाडावरच्या घरात झोपायचं हे त्याचं स्वप्न होतं.

समाद एक दिवस खरोखरच अशा सफरीवर निघाला.
वाटेत त्याला नानाविध मित्रमंडळी भेटली.
अनेक विस्मयकारी शोधसुद्धा लागले...
वाळवंटात आणि रानात भटकताना एवढी मजा कधीच आली नसेल!

तुम्हीही समादच्या या सफरींत सहभागी व्हा आणि
त्या रोमहर्षक सफरींचा आनंद लुटा!





# दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।।

श्री समर्थ रामदास स्वामी

**❊ वाचकांसाठी सुवर्णसंधी ❊**
**करा मैत्री पुस्तकांशी**
**'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा**
**नवीन उपक्रम**
**१६ मे २०१८ ते १५ जून २०१८**
**दरम्यानचा दिनविशेष**

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com



# दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
## ५० टक्क्यांपर्यंत सूट

### १७ मे - अंजनी नरवणे यांचा जन्मदिन

‘नॉट अ पेनी मोर नॉट अ पेनी लेस, आय लॅस्ट माय लव्ह इन बगदाद, रुसी मोदी - द मॅन हू ऑल्सो मेड स्टील, अकूपार, अक्षयपात्र, नारायण मूर्ती : मूल्य जपणारं एक अद्वितीय आयुष्य, ख्यातनाम इतिहासकार, अणसार, चला! उठा! कामाला लागा!’ पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ४१८५/-**

*१७ मे ते १९ मेपर्यंत*

**सवलत किंमत २४४९/-**

### १९ मे - वासंती घोसपूरकर यांचा जन्मदिन

‘वादळफूल’या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३००/-**

*१९ मे ते २१ मेपर्यंत*

**सवलत किंमत १९९/-**

### २९ मे - जागतिक शांतिदूत दिन

**भाग १ -** ‘मी मलाला, महात्मा गांधी आणि तीन माकडे, ममतेची मूर्ती : मदर तेरेसा, मदर टेरेसा, Speeches That Reshaped the World’ पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १३००/-**

**सवलत किंमत ७५९/-**

**भाग २ -** ‘मोहनदास, दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल, Speeches of War & Peace’ पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १३२५/-**

*२९ मे ते ३१ मेपर्यंत*

**सवलत किंमत ७७४/-**



## ३१ मे - अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन

**भाग १** - ‘कर्मयोगिनी, सती साध्वी देवी अहिल्या’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३९५/-**

**सवलत किंमत २४९/-**

**भाग २** - ‘कर्मयोगिनी (इंग्रजी)’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३५०/-**

*३१ मे ते १ जूनपर्यंत*

**सवलत किंमत २१९/-**

## ३१ मे - मिलिंद जोशी यांचा जन्मदिन

मिलिंद जोशी लिखित ‘एका परिसाची कथा’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**सवलत किंमत २१९/-**

**मूळ किंमत - ३००/-**

*३१ मे ते १ जूनपर्यंत*

## ४ जून - जागतिक बालशोषणविरोधी दिन

**भाग १** - ‘हरवलेले बालपण, झोंबी, खाली जमीन वर आकाश, वेस्टेड, हिरॉईन ऑफ द डेझर्ट, बिलाँगिग, नेव्हर टु रिटर्न, अॅन आय फॉर अॅन आय, द काइट रनर, अ थाऊजंड स्प्लेन्डिड सन्स’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २४८०/-**

**सवलत किंमत १५४०/-**

**भाग २** - ‘डिनायल, द डायरी ऑफ मेरी बर्ग, परवाना, वेदनेची फुले, मी मलाला, आय एम अ टॅक्सी, शौझिया, द ब्रेडविनर,लव्हिंग नताली’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**सवलत किंमत १०४९/-**

**संचाची मूळ किंमत - १७२५/-**

*४ जून ते ६ जूनपर्यंत*



## ५ जून – जागतिक पर्यावरण दिन

**भाग १ -** ‘वसुंधरा, पर्यावरण प्रदूषण, वेध पर्यावरणाचा, ‘आपली सृष्टी’ या १० पुस्तकांचा संच, वायू प्रदूषण, विपुलाच सृष्टी, कथारूपी खगोलशास्त्र’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २३५०/-**

**सवलत किंमत १५०९/-**

**भाग २ -** ‘केल्याने होत आहे रे..., अंतरिक्षाच्या अंतरंगात, पृथ्वीवर माणूस उपराच!, विज्ञान नवलाई संच (६पुस्तके), परग्रहावरील अंतराळवीर, अंतरिक्षाचा वेध, अवनी एक नवी’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १३२०/-**

*५ जून ते ८ जूनपर्यंत*

**सवलत किंमत ८५९/-**

## ५ जून - केन फोलेट यांचा जन्मदिन

‘ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स’ या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत - ३००/-**

*५ जून ते ७ जूनपर्यंत*

**सवलत किंमत १९९/-**

## ७ जून - नीला चांदोरकर यांचा जन्मदिन

‘फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स (मराठी), हात विधात्याचे, इन्फिडेल, जीव जिथे गुंतलेला..., मोरॅलिटी फॉर ब्यूटीफुल गर्ल्स, द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी, अन्कंडिशनल लव्ह’ या **अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १९१०/-**

*९ जून ते ११ जूनपर्यंत*

**सवलत किंमत ११६७/-**



## ९ जून - किरण बेदी यांचा जन्मदिन

अ‍ॅज आय सी – स्त्रियांचे सक्षमीकरण, भारतीय पोलिस सेवा, नेतृत्व आणि प्रशासन, आय डेअर, बी द चेंज... भ्रष्टाचाराशी लढा, इट्स ऑलवेज पॉसिबल, मजल... दरमजल..., व्हॉट वेंट राँग अ‍ॅन्ड व्हाय' या **अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १७४०/-**

**सवलत किंमत ११९०/-**

*९ जून ते ११ जूनपर्यंत*

## १२ जून - अ‍ॅन फ्रँक यांचा जन्मदिन

'डायरी ऑफ अ‍ॅन फ्रँक' या अनुवादित पुस्तकावर सवलत.

**मूळ किंमत - २२०/-**

**सवलत किंमत १५०/-**

*१२ जून ते १४ जूनपर्यंत*

## १२ जून - जागतिक बालकामगार विरोधी दिन

**भाग १** - 'हरवलेले बालपण, आय एम अ टॅक्सी, खाली जमीन वर आकाश, शेम, वेदनेची फुले, सर्चिंग फॉर डॅडी, हिरॉईन ऑफ द डेझर्ट, शॅपेल' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**सवलत किंमत १०२९/-**

**संचाची मूळ किंमत – १७१०/-**

**भाग २** - 'झोंबी, वेस्टेड, बिलाँगिंग, नेव्हर टु रिटर्न, अ‍ॅन आय फॉर अ‍ॅन आय, द काइट रनर, अ थाऊजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**सवलत किंमत ११२०/-**

**संचाची मूळ किंमत – १८३०/-**

*१२ जून ते १५ जूनपर्यंत*



**१२ जून - भा. द. खेर यांचा जन्मदिन**

भा. द. खेर लिखित 'चाणक्य, दिग्विजय, प्रबुद्ध' या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – १२००/-**

*१२ जून ते १४ जूनपर्यंत*

**सवलत किंमत ७९९/-**

**१५ जून - अण्णा हजारे यांचा जन्मदिन**

'अण्णा हजारे, लढा लोकपालचा' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ३४०/-**

*१५ जून ते १६ जूनपर्यंत*

**सवलत किंमत २१९/-**

## MAY महिना विशेष

**'M' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४३% पर्यंत सूट.**

**संच** - १ मधील २२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ४९८५/-** **सवलत किंमत - २९९१/-**

**संच** - २ मधील २८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ५२८५/-** **सवलत किंमत - ३१७१/-**

**संच** - ३ मधील २४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ५०९५/-** **सवलत किंमत - ३०५७/-**

**संच** - ४ मधील २६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ५००५/-** **सवलत किंमत - ३००३/-**

**संच** - ५ मधील २१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ५०९५/-** **सवलत किंमत - ३०५७/-**

**संच** - ६ मधील १८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ४०७५/-** **सवलत किंमत - २३२३/-**



**‘A’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४३% पर्यंत सूट.**

**संच - १** मधील **२०** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५०५०/-** **सवलत किंमत - ३०३०/-**

**संच - २** मधील **२६** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५१०५/-** **सवलत किंमत - ३०६३/-**

**संच - ३** मधील **२३** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ४७१०/-** **सवलत किंमत - २६८५/-**

**संच - ४** मधील **२०** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ४५९५/-** **सवलत किंमत - २७५७/-**

**संच - ५** मधील **३१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५१९०/-** **सवलत किंमत - ३११४/-**

**संच - ६** मधील **२७** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ४७५९/-** **सवलत किंमत - २७१३/-**

**‘Y’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ३५% पर्यंत सूट.**

**संच - १** मधील **११** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - १७५५/-** **सवलत किंमत - ११४१/-**

***१ मे ते ३१ मेपर्यंत***

## JUNE महिना विशेष

**‘J’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४३% पर्यंत सूट.**

**संच - १** मधील **२१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ४२१०/-** **सवलत किंमत - २४००/-**

**संच - २** मधील **१६** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ३२३०/-** **सवलत किंमत - १९३८/-**



### ‘U’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट.

**संच - १** मधील ८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - २०४५/-** **सवलत किंमत - १२२७/-**

**संच - २** मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - १८७०/-** **सवलत किंमत - ११२२/-**

### ‘N’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४३% पर्यंत सूट.

**संच - १** मधील १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - २१०५/-** **सवलत किंमत - १२६३/-**

**संच - २** मधील ९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - २०७०/-** **सवलत किंमत - १२४२/-**

**संच - ३** मधील २० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ३६००/-** **सवलत किंमत - २०५२/-**

### ‘E’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४३% पर्यंत सूट.

**संच - १** मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - २०९०/-** **सवलत किंमत - १२५४/-**

**संच - २** मधील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - २३६५/-** **सवलत किंमत - १४१९/-**

**संच - ३** मधील ९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ३२५५/-** **सवलत किंमत - १८५५/-**

***१ जून ते ३० जूनपर्यंत***

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील आणि आद्याक्षरांच्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**किमतींमध्ये बदलाची शक्यता**

**अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / What's App No. 9420594665**

website : www.mehtapublishinghouse.com



पुस्तक परिचय

# गरुडजन्माची कथा

त्रिमूर्तींच्या आगळ्यावेगळ्या कथा



सुधा मूर्ती यांचा जन्म १९५० साली कर्नाटक राज्यातल्या शिग्गावि येथे झाला. त्यांनी कॉम्प्युटर सायन्स या विषयातील एम.टेक. ही पदवी प्राप्त केली आहे. पुणे येथे ‘टेल्को’ कंपनीत निवडल्या गेलेल्या त्या पहिल्या स्त्री अभियंता होत्या. त्या विख्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि कुशल लेखिका आहेत. सुधा मूर्ती या ‘इन्फोसिस फाउंडेशन’च्या अध्यक्षा आहेत. या फाउंडेशनतर्फे करण्यात येणाऱ्या समाजोपयोगी कार्यासाठी त्या विख्यात आहेत. कर्नाटकातल्या सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या चळवळीच्या त्या प्रणेत्या आहेत.

१९ नोव्हेंबर, २००४ मध्ये त्यांना समाजकार्याच्या क्षेत्रातील त्यांच्या असामान्य योगदानाबद्दल ‘राजलक्ष्मी पुरस्कार’ मिळाला. २००६मध्ये त्यांना भारत सरकारतर्फे ‘पद्मश्री’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुधा मूर्ती यांना सामाजिक कार्य आणि साहित्यसेवेसाठी सहा डॉक्टरेट्स मिळाल्या आहेत. यापैकी दोन डॉक्टरेट्स महाराष्ट्रातील एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे देण्यात आल्या. कर्नाटकातील गुलबर्गा विद्यापीठाकडून साहित्य क्षेत्रातील कार्यासाठी एक आणि कर्नाटक



विद्यापीठाकडून एक अशा दोन डॉक्टरेट्स त्यांना बहाल करण्यात आल्या. तमिळनाडूतील सत्यभामा विद्यापीठाने आणि आंध्रप्रदेशातील श्री पद्मावती विश्वविद्यालयानेही त्यांना डॉक्टरेट्स देऊन सन्मानित केले.




लेखक
**सुधा मूर्ती**

अनुवाद
**लीना सोहोनी**

*ब्रह्मदेवाला कोणे एके काळी पाच मस्तकं होती हे तुम्हास माहीत आहे का? भगवान शंकराने आपल्या जटांमध्ये चंद्रकोर का धारण केली आहे, याबद्दल तुम्हाला काही ठाऊक आहे का? देव इतरांची फसवणूक करतात का?*

*आपणा सर्वांना एक गोष्ट निश्चित माहीत आहे– ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींचं चराचरात अस्तित्व असून, हे जग आणि आपली मानवजात अस्तित्वात आहे, ती केवळ त्यांच्यामुळेच. संपूर्ण भारतात सगळीकडे या तीनही देवतांची उपासना केली जाते; परंतु या देवतांबद्दलच्या अनेक सुरस*



*आणि चमत्कृतिजन्य कथा अजूनही फारशा कुणाला माहीत नसतात.*

*अनेक पुरस्कारविजेत्या लेखिका सुधा मूर्ती या वाचकांना हाताला धरून या अनोख्या, अज्ञात प्रदेशात घेऊन जातात. प्राचीन युगातील या तीन अत्यंत शक्तिशाली देवतांविषयीच्या अद्‌भुतरम्य कथा त्या वाचकांसमोर उलगडतात. कथासंग्रहातील प्रत्येक कथा तुम्हा सर्वांना एका वेगळ्याच मंतरलेल्या विश्वात घेऊन जाईल. त्या कथा ज्या कालखंडात घडतात, तेव्हाच्या व्यक्ती मनोवेगाने दूरदूरच्या प्रदेशात भ्रमंती करू शकतात, यातले प्राणी उडू शकतात आणि यात पुनर्जन्म तर नेहमीच होत असतात.*

## प्रस्तावना

भारतात ईश्वराच्या तीन रूपांना एकत्रितपणे त्रिमूर्ती असं म्हणतात. हे तीन देव म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश. या तिघांना मिळून त्रिमूर्ती म्हणतात.

ते तिघं मिळून विश्वाच्या एकात्मतेचं प्रतीक आहेत. परंतु त्यांच्यापैकी प्रत्येकाची स्वतःची वेगळी ओळख आहे, प्रत्येकाचं वैशिष्ट्य वेगळं आहे. ते लोकांना वरदान देतात. भारतभर सर्वत्र घरोघरी तसंच मंदिरांमध्ये लोक रोज त्यांची प्रार्थना करतात. त्यांचं माहात्म्य वर्णन करणारी स्तोत्रं गातात.

पण तरीही मनात एक प्रश्न उठतोच.

आपल्याकडे शंकराची तसंच विष्णूची व त्याच्या अनेक अवतारांमधील रूपांची असंख्य देवालयं आहेत; पण ब्रह्माची मंदिरं फारशी कुठेच आढळून येत नाहीत. खरं तर त्रिमूर्तींमधील ब्रह्मा हाही तेवढाच महत्त्वाचा देव आहे आणि तरीही हे असं का बरं?

राक्षस किंवा असुर हे सतत अमरत्व मिळवण्यासाठी धडपड करताना दिसतात. ते अनेकदा त्या प्रयत्नांत देवांचीसुद्धा फसवणूक करतात, पण त्यांचे ते प्रयत्न कधीही यशस्वी होत नाहीत, असं कशामुळे घडतं?



५ वी आवृत्ती

# आजीच्या पोतडीतल्या गोष्टी




लेखक
**सुधा मूर्ती**

अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

सुरस आणि चमत्कारिक गोष्टी ऐकायला कुणाला आवडत नाहीत! उन्हाळ्याच्या सुट्टीत कधी दिवसा, तर कधी रात्री आजी आपल्या नातवंडांना गोष्टी सांगायला घेऊन बसते. ही नातवंडं आपल्या आजीकडे खेड्यात सुट्टी घालवायला आलेली असतात. आजीने आपल्या गोष्टींची पोतडी उघडल्यावर सगळे जण तिच्याभोवती गोळा होतात. आजीच्या पोतडीतून राजाच्या आणि भामट्यांच्या, माकडांच्या आणि उंदरांच्या, अस्वलाच्या आणि देवाच्या अशा असंख्य गोष्टी निघतात.
त्यात एक अस्वल खूप वाईट खीर खाऊन चिडतं, तर कधी गोष्टीतला माणूस इतका आळशी असतो की, समोर आग लागलेली दिसत असूनसुद्धा ती विझवण्याचे कष्ट घेत नाही आणि अखेर स्वत:ची दाढी पेटल्यावर घाबरतो! कधी एका राजकन्येचं कांद्यात रूपांतर होतं, तर कधी एक राणी रेशमी वस्त्र बनवण्याच्या कलेचा शोध लावते.



सरस्वती, लक्ष्मी आणि पार्वती या अनुक्रमे ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वर यांच्या पत्नी. परंतु पार्वतीचे अनेक अवतार पाहायला मिळतात. पार्वती ही आपल्याकडे शक्ती म्हणूनसुद्धा लोकप्रिय आहे. शक्ती हे स्त्रीचं दैवी रूप आहे आणि दुर्गा ही तर दुष्टांचं निर्दालन करणारी, अन्यायाचा प्रतिकार करणारी वीरांगना आहे. मग ही नाजूक, कोमल, सुंदर अशी पार्वती शक्तीची देवता किंवा वीरांगना म्हणून कशी काय प्रसिद्धीस आली असेल?

भारतीय पुराणाविषयी मी जी मालिका लिहीत आहे, त्यातला हा दुसरा खंड आहे. माझे प्रिय वाचक आणि त्यांच्या पुढच्या पिढ्यांसाठी हा सर्व लेखनप्रपंच मी सुरू केला आहे.

नेहमीप्रमाणेच माझ्या याही पुस्तकाच्या संपादनाचं काम श्रुती खुराना यांनी समर्थपणे पार पाडलं, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. हे पुस्तक तुमच्यापर्यंत पोहोचवण्यात अंजू कुलकर्णी यांचासुद्धा मोलाचा वाटा आहे. पेंग्विन प्रकाशन संस्थेच्या सोहिनी मित्रा आणि हेमाली सोधी यांनी माझी ही कल्पना साकार करण्यासाठी मला पाठबळ दिलं, माझ्यावर विश्वास ठेवला. या सर्वांचीच मी अत्यंत ऋणी आहे.

## गरुडजन्माची कथा

महर्षी कश्यप हे सप्तर्षींपैकी एक असून, त्यांना संपूर्ण चर सृष्टीचे पिता मानण्यात येतं. एक दिवस कश्यप ऋषी आपल्या दोन पत्नी विनता आणि कद्रू यांना जवळ बोलावून म्हणाले, ''मी तुम्हा दोघींना एक एक वरदान देऊ इच्छितो. तर तुम्ही मला तुमच्या मनातली इच्छा सांगा.''

त्यावर कद्रू स्मितहास्य करून म्हणाली, ''मला एक हजार पुत्र हवे आहेत.''

त्यावर कश्यप ऋषींनी होकार दिला. मग ते विनताकडे वळले. विनता म्हणाली, ''पतिदेव, मला फक्त दोनच पुत्र हवे आहेत. पण ते दोघं कद्रूच्या सर्व पुत्रांपेक्षा जास्त शक्तिशाली असले पाहिजेत.''

''तथास्तु!'' कश्यप त्या दोघींना आशीर्वाद देत म्हणाले.

काही दिवसांतच कद्रू आणि विनता या दोघींनी अंडी घातली. कद्रूची



अंडी लवकर उबली आणि त्यातून नागांची पिले बाहेर आली. पृथ्वीवर नागांच्या जातीचा उदय यांपासून झाला, असं मानतात. यांमधलाच सर्वांत ज्येष्ठ नाग म्हणजे आदिशेष. या आदिशेष नागाच्या वेटोळ्याची शय्या करून त्यावरच भगवान विष्णू पहुडलेले असतात. त्यानंतरचा नाग म्हणजे वासुकी. हाच पुढे नागांचा राजा बनला.

विनता प्रतीक्षा करत होती, पण तिची अंडी मात्र जशीच्या तशीच होती.

एक दिवस विनता आणि कद्रू अशा दोघी समुद्रकिनारी फेरफटका मारण्यासाठी निघाल्या होत्या. अचानक विनताला आकाशात उच्चैश्रवा अश्व उडताना दिसला. समुद्रमंथनातून बाहेर आलेला हा सात मस्तकांचा अश्व!

विनता कद्रूकडे वळून म्हणाली, ''तो बघ आकाशात उडणारा घोडा. कसा हिमासारखा पांढराशुभ्र आहे हा. बघ, किती सुंदर आहे हा.''

आकाशात दूरवर उडत जाणाऱ्या त्या अश्वाकडे कद्रू जरा वेळ बघत राहिली. बघताबघता तो काळोख्या नभात अदृश्य झाला. ''नाही गं, विनता,'' कद्रू म्हणाली, ''तू नीट पाहा ना. त्याची शेपटी काळी आहे.''

मग दोघी पुन्हा एकदा आभाळाकडे निरखून पाहू लागल्या. पण तोपर्यंत तो अश्व दिसेनासा झालेला होता.

तो अश्व अगदी पांढराशुभ्र असल्याची विनताची खात्री होती. तिनं कद्रूला तसं वारंवार सांगितलं. आता कद्रूलाही नीट आठवेना, की तो पूर्ण पांढरा होता, का त्याची शेपटी काळी होती. पण तिचा अहंकार वर उफाळून आला होता. त्यामुळे ती विनताचं म्हणणं खरं आहे, हे मान्य करायला मुळीच तयार नव्हती. दोघीही आपापल्या मतावर ठाम होत्या. मग दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा त्याच ठिकाणी यायचं आणि तो अश्व आकाशात उडताना दिसला, तर त्याच्याकडे नीट पाहून मग काय ते ठरवायचं, असा त्यांनी निर्णय घेतला. पण तत्पूर्वी त्यांनी एक पैज लावली.

ती पैज तशी साधीच होती. जर त्या अश्वाची शेपटी खरोखरच काळी निघाली असती, तर कद्रू ती पैज जिंकणार होती. मग विनताला जन्मभर तिची गुलामगिरी करावी लागणार होती. पण जर तो अश्व संपूर्णपणे पांढराशुभ्र असता, तर मात्र कद्रूला विनताची गुलाम होऊन राहावं लागणार होतं.

त्या दोघी घरी परतल्यावर कद्रूनं आपल्या मुलांना या पैजेविषयी



सांगितलं. त्यावर तिची मुलं म्हणाली, ‘‘आई, अगं चुकते आहेस तू. उच्चैश्रवाची शेपटी काळी नसून पांढरीच आहे. तू तर ही पैज हरणार आहेस.’’

आता कद्रूचा धीर सुटला. तिला काही जन्मभर विनताची गुलाम होऊन राहायचं नव्हतं. मग ती तिच्या मुलांना म्हणाली, ‘‘तुम्ही आपल्या आईला मदत नाही का करणार? हे पाहा, तुम्ही सर्प आहात. तुमच्यातल्या काहींनी जाऊन त्या उच्चैश्रवाच्या शेपटीला विळखा घातला, तर ती शेपटी दुरून काळीच दिसेल ना? विनता क्षणभरच त्या अश्वाकडे रोखून बघेल. तेवढा वेळच फक्त तुम्हाला त्याच्या शेपटीला विळखा घालून बसावं लागेल. एकदा मी आणि विनता त्या अश्वाकडे पाहून तिथून परत निघालो, की त्यानंतर तुम्हाला पण तिथून परत जाता येईल. हे पाहा, कुठल्याही परिस्थितीत ही पैज हरणं मला परवडणारं नाही.’’

‘‘पण आई, ही शुद्ध फसवणूक आहे. असा खोटेपणा करून कुणाला फसवणं मुळीच योग्य नाही. तूच तर आम्हाला नेहमी सत्याची कास धरून वागायला, न्याय्य मार्गानं जगायला शिकवलंस ना?’’ मुलं तिला विरोध करत म्हणाली.

पण जन्मभर विनताची गुलाम होऊन राहण्याची कल्पना कद्रूला अगदी असह्य झाली होती. कद्रू आता निराशेनं आणि संतापानं रडू लागली. ‘‘तुम्हा मुलांच्या या हट्टापायी मी आता जन्मभर तिची गुलामगिरी करणार. ठीक आहे. तुमची काही आपल्या आईचं रक्षण करण्याची इच्छा दिसत नाही. त्यामुळे मीसुद्धा तुम्हाला शाप देत आहे. एका मोठ्या सर्पयज्ञात तुम्हा सर्वांचा विनाश होईल.’’

कद्रूची ही शापवाणी पुढे खरी झाली. हस्तिनापूर नगरीत राजा जनमेजयाच्या राज्यात त्यानं आपल्या पित्याच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी एक मोठा सर्पयज्ञ केला व त्यात अनेक सर्पांची आहुती दिली. जनमेजय हा परीक्षिताचा वारस आणि पांडवांमधील अर्जुनाचा नातू होता.

तिच्या सर्व सर्पपुत्रांपैकी फक्त एक सर्प तिच्या मदतीला धावून आला. त्याचं नाव होतं कर्कोटक.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे विनता आणि कद्रू समुद्रकिनारी गेल्या. तो उच्चैश्रवा आकाशात आनंदानं विहार करत होता; पण या खेपेस त्याची



शेपटी काळी दिसत होती. कद्रू आणि विनता या दोघींनीही ते दृश्य नीट निरखून पाहिलं.

यामध्ये काही काळेबेरं असेल अशी विनताला शंकासुद्धा आली नाही. आपण पैज हरल्याचं मान्य करून ती कद्रूची गुलाम बनून राहू लागली.

कद्रू म्हणाली, ''माझे सर्व पुत्र एक दिवस मृत्युमुखी पडणार आहेत. त्यांना पुन्हा जीवित केलं, तरच तुझी या गुलामगिरीतून मुक्तता होईल. पण तसं होईपर्यंत तुला माझी गुलाम म्हणून राहावं लागेल.''

अशी कित्येक वर्षं गेली, पण अजूनही विनताची अंडी जशीच्या तशीच होती. कद्रूची गुलामगिरी करून ती अगदी निराश झाली होती. एक दिवस तिचा संयम सुटला. तिनं धीर करून त्यातलं एक अंडं बोटांनी अलगद दाबून ते फोडलं. त्यानंतर एक धक्कादायक गोष्ट घडली. त्या अंड्यातून एक देखणा मुलगा बाहेर आला. पण त्याच्या पायांची अजिबात वाढझालेली नव्हती.

''आई!'' तो मुलगा विषादानं म्हणाला, ''या अंड्याचा भंग करण्याची एवढी घाई तू का केलीस? चांगल्या गोष्टीसाठी नेहमी धीर धरावा लागतो. तुझ्या या उतावीळपणाची केवढी मोठी किंमत मला मोजावी लागत आहे. मला तर पायच नाहीत. आता मी ते अमृत तुला कसं आणून देऊ?''

विनता दुःखावेगानं रडत म्हणाली, ''बाळा, माझ्या हातून घडलेल्या चुकीची शिक्षा तुला भोगावी लागते आहे. मला क्षमा कर. पण तू कुठे निघालास? तू असा कुठेही जाऊ नको. तुझी काळजी कोण घेणार? मी इथे तुझी काळजी घेईन.''

''नाही, आई. मला आता निघायला हवं. मी आता सूर्यदेवाच्या रथाचा सारथी होईन. मी त्याचा सात घोड्यांचा रथ सांभाळीन आणि पहाटेपासून संध्याकाळपर्यंत त्याचं सारथ्य करीन. हे काम माझ्यासाठी योग्य ठरेल, कारण सारथ्य करताना पायांचा वापर करावा लागत नाही.''

''बाळा, तू मला परत कधी भेटशील?'' विनता काकुळतीला येऊन म्हणाली. आपलं बाळ लगेचच आपल्यापासून दूर जाणार, या कल्पनेनं ती व्याकूळ झाली होती.

''आई, अगं तू तर मला रोजच सकाळी पाहू शकशील. लोक मला अरुण म्हणून ओळखतील. मी रोज सूर्यदेवांच्या बरोबरच तर असेन. पण



आता पुढच्या वेळी मात्र अशी अधिरता दाखवू नकोस. संयमानं वाग. जेवढी प्रतीक्षा करावी लागेल, तेवढी कर. तुला दुसरा मुलगा होईल. तोच तुझी या गुलामगिरीतून मुक्तता करेल.''

त्यानंतर अरुण आपल्या मातेला तिथेच सोडून स्वतःचं नशीब आजमवण्यासाठी निघाला आणि सूर्याचा सारथी बनला. त्यामुळेच सूर्योदयाला अरुणोदय असंही म्हणतात. अरुणोदय याचा अर्थ अरुणाचं आगमन.

या घटनेनंतर दुसऱ्या अंड्याची विनतानं डोळ्यांत तेल घालून काळजी घेतली. आधी तिच्या हातून जी महाभयंकर चूक झाली होती, त्यामुळे पुढचं अंडं घाईनं भंग करण्याची तिची इच्छा नव्हती. तिचं मन अपराधी भावनेनं भरून गेलं होतं. त्यानंतरही अनेक महिने आणि वर्षं लोटली.

अखेर एक दिवस ते अंडं फुटून त्यातून एक मानव बाहेर आला. त्याचा चेहरा पक्ष्याचा होता आणि त्याला बळकट असे पंख होते. ''आई, मी आलो!'' तो म्हणाला. ''तू धीरानं माझ्या येण्याची प्रतीक्षा केलीस, मोठा संयम दाखवलास, त्यामुळे माझी व्यवस्थित वाढझाली. माझ्या पंखांमध्ये बळ आलं. आता मी कुठेही भरारी घेऊ शकतो. मी बलाढ्य असा गरुड आहे. मी भगवान विष्णू व त्यांची पत्नी लक्ष्मीदेवी यांचं प्रमुख वाहन बनणार आहे. मी तुझी या गुलामगिरीतून मुक्तता करीन, असं मी तुला आश्वासन देतो.''

एवढं बोलून त्यानं आपले पंख पसरून आकाशात उंच भरारी घेतली. त्याची आई जमिनीवरून त्याच्याकडे अभिमानाने पाहत राहिली. त्याचं ते बलशाली रूप पाहून तिला अतिशय आनंद झाला होता. त्यानं दिलेलं वचन ऐकून तिची चिंता मिटली होती.

तिनं तिच्या मुक्ततेसाठी फार काळ वाट पाहिली होती.

❖



**७वी आवृत्ती**

# सुकेशिनी आणि इतर कथा



लेखक
**सुधा मूर्ती**

अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

सुधा मूर्तींनी लिहिलेल्या बालकथांचं हे पुस्तक.
यात काही भारतीय आणि काही विदेशी कथा आहेत, तर काही सुधा मूर्ती यांनी स्वत: लिहिलेल्या आहेत.
नेहमी लबाडपणा करणाऱ्या कोल्ह्याचं इथे परोपकारी रूप पहायला मिळेल. आजोबांनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी गाय, माकड आणि बुजगावणं इथे भेटतील.
आलेल्या संकटांनी घाबरून न जाता चतुराईने त्यांवर मात करणाऱ्या अनेक स्त्रिया पहायला मिळतील.
जादूच्या मदतीनं संपत्ती मिळू लागल्यावर लोकांना मदत करणारे आणि तरीही
श्रमांवरच भिस्त ठेवणारे तरुणही भेटतील.
एका वेगळ्याच विश्वाची सफर
या गोष्टी घडवून आणतील.

# पुस्तक परिचय

# समादचा वाळवंटातील
# व
# रानातील फेरफटका



मोहम्मद उमर यांचा जन्म नायजेरियातील बाउची राज्यात अझारे येथे झाला. मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटीची पत्रकारिता विषयातील एम.ए. (१९९१) ही पदव्युत्तर पदवी, तसेच इंग्लंडमधील मिडलसेक्स युनिव्हर्सिटीची राजकीय अर्थकारण विषयातील आणखी एक एम.ए. (१९९५) ही पदव्युत्तर पदवी त्यांनी प्राप्त केली आहे. इंग्लंडमधील अनेक मान्यवर संस्थांमध्ये त्यांनी कायदा आणि आंतरराष्ट्रीय संबंध या विषयांचेही अध्ययन केले आहे. १९८१ मध्ये मोहम्मद उमर यांनी नायजेरियातील झरिया येथील अहमदु बेल्लो विद्यापीठात राजकारणशास्त्र या विषयाचे अध्ययन केले.

बाउची राज्याच्या आकाशवाणी केंद्रावर काही काळ त्यांनी बातमीदार म्हणून काम केले आणि त्यानंतर नायजेरियातील कानो येथील ‘ट्रायम्फ न्यूजपेपर्स लिमिटेड’ येथे काम केले. ते लंडनमध्ये कार्यरत असून तिथेच त्यांचे वास्तव्य आहे. ‘अमिना’ ही कादंबरी त्यांच्या नावावर आहे.






लेखक

**मोहम्मद उमर**

अनुवाद

**लीना सोहोनी**

*समादला बाहेर भटकायला जाण्याची भारी हौस. एक अख्खा दिवस वाळवंटात भटकंती करायची ओॲसिसमधल्या जलाशयात मनमुराद पोहायचं, किंवा एखाद्या रानात जाऊन तिथल्या प्राण्यांना भेटायचं, झाडावरच्या घरात झोपायचं हे त्याचं स्वप्न होतं.*

*समाद एक दिवस खरोखरच अशा सफरीवर निघाला. वाटेत त्याला नानाविध मित्रमंडळी भेटली. अनेक विस्मयकारी शोधसुद्धा लागले... वाळवंटात आणि रानात भटकताना एवढी मजा कधीच आली नसेल!*

*तुम्हीही समादच्या या सफरींत सहभागी व्हा आणि त्या रोमहर्षक सफरींचा आनंद लुटा!*



# समादचा रानातील फेरफटका

कोणे एके काळी एका गावात एक मुलगा राहात असे.

त्याचं नाव समाद. समादचं एक स्वप्न होतं – आपण एक आख्खा दिवस रानात घालवावा, तिथल्या प्राण्यांना भेटावं आणि झाडावर छोटंसं घर बांधून त्यात झोपावं, असं त्याला वाटे. असाच एकदा एक सुंदर दिवस उजाडला. रानात सगळे प्राणी एकत्र जमले. समादचं आपल्या सगळ्यांवर किती प्रेम आहे हे त्यांच्या कानावर आलं. मग आपण समादला नक्की भेटायचं, असं त्या सर्वांनी ठरवलं. त्यांनी त्याला रानात येण्याचं निमंत्रण दिलं. अशा रीतीनं समादच्या रानातल्या साहसकथेला सुरुवात झाली.

सुरुवातीला त्याला तीन पक्षी भेटले.

ते मधुर गाणी गात त्याच्याभोवती  घिरट्या घालू लागले.

जरा वेळात ते त्याच्यासाठी एक गाणं म्हणू लागले.

*आम्ही खूप खूश आहोत.*
*सूर्योदय होत आहे.*
*वारा वाहात आहे.*
*समाद भेटायला आला आहे.*

त्यांचं गाणं संपल्यावर समाद आणि ते पक्षी रानात जायला निघाले.

त्यानंतर समादला तीन काळवीट भेटले. ते आनंदाने नाचत होते.





**११वी आवृत्ती**

# थैलीभर गोष्टी

लेखक
**सुधा मूर्ती**

अनुवाद
**लीना सोहोनी**



**किंमत : १७०/-रु.। पोस्टेज : ५०/-रु.**

राजे राजवाडे, महाराण्या, राजपुत्र, राजकन्या, कंजूष माणसं, जवळ फुटकी कवडीही नसलेली दरिद्री माणसं, शहाणी माणसं, विद्वान माणसं, चतुर माणसं, मूर्ख आणि अडाणी माणसं, चमत्कारिक स्त्रिया व पुरुष, चित्रविचित्र घटना या सुरस कथांमधून जिवंत होऊन आपल्या भेटीला येतात. एका कथेतील बुद्धिमान राजकन्येला आपल्यापेक्षा हुशार पती हवा असतो, म्हणून ती सर्व विवाहोत्सुक तरुणांना प्रत्येकी नऊ प्रश्न विचारण्याची संधी देते, पण अखेर तिलाही निरुत्तर करणारा कोणीतरी भेटतोच... एक अनाथ मुलगा आपल्या दुष्ट काकांना चांगली अद्दल घडवतो... आणि संकटात सापडलेल्या एका वृद्ध जोडप्याला उपयोगी पडतो तो एक ढोल! यातील काही कथा लेखिका सुधा मूर्ती यांनी आपल्या बालपणी आजी-आजोबांकडून ऐकल्या... तर काही कथा देशोदेशी केलेल्या भ्रमंतीच्या दरम्यान त्यांना ऐकायला मिळाल्या... काही कथा त्यांच्या स्वत:च्या कल्पनाशक्तीतून कागदावर उतरल्या... या सर्वच्या सर्व सुरस, कालातीत अशा लोककथा गेली कित्येक वर्षं लेखिकेच्या मनात घर करून राहिलेल्या आहेत. वेळोवेळी आपल्या सहवासात आलेल्या लहान मुलामुलींना, आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्या सांगितल्या आहेत. आज या कथासंग्रहाच्या रूपाने या सर्व कथा लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वच वाचकांना वाचनासाठी उपलब्ध होत आहेत.



समादला पाहून ते भलतेच खूश झाले होते.

"तुम्ही का बरं नाचताय?" समाद म्हणाला.

"आम्ही नाचतोय कारण आम्ही खूप खूश आहोत. आम्ही नाचतोय कारण सूर्य तळपतोय. आता लवकरच पाऊस येईल. गवतसुद्धा उगवायला लागलंय," एक काळवीट म्हणालं.

"ये समाद. आमच्याबरोबर तूही नाच."

त्यांचं नाचणं संपल्यावर समाद, ते पक्षी आणि काळवीट रानाच्या आत चालत चालत पुढे निघाले.

त्यानंतर त्याला झाडावरती एक माकड बसलेलं दिसलं.

*"अरे समाद, ये ना. चल, माझ्याशी खेळ.*
*एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर*
*उड्या मारायला इतकी मजा येते म्हणून सांगू."*
*"पण झाडाच्या फांदीला लटकून,*
*एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर*
*उड्या कशा मारायच्या हे मला नाही माहीत."*
*"काळजी करू नको. मी शिकवीन ना तुला."*
*नको, नको. त्यापेक्षा तूच खाली ये*

आणि माझ्याशी खेळ," समाद म्हणाला.

"चालेल."

माकड झाडावरून खाली आलं. एक भलं मोठं वानरही त्यांच्यात सामील झालं. तिकडे ते भलं मोठं वानर काय करतंय?" समादनं माकडाला विचारलं.

"तुम्ही माणसं जसं सूर्याला खाता ना, तसंच ते पण सूर्याला खातंय."

"पण कसं काय?" समादनं आश्चर्यानं विचारलं.

"हे बघ, वनस्पतींची वाढहोण्यासाठी, त्यांना पानंफुलं येऊन ती



बहरण्यासाठी त्यांना सूर्यप्रकाशाची गरज असते. तुम्ही माणसं वनस्पती आणि पानं खाता. ससे आणि गाई यांसारखे प्राणी ह्या वनस्पती आणि त्यांची पानं खातात आणि तुम्ही माणसं त्या प्राण्यांना खाऊन टाकता. म्हणजेच तुम्ही सूर्यप्रकाश खाता.''

''बरं, अच्छा.'' चल. पाऊस पडायला सुरुवात होण्याआधी आपण सूर्यप्रकाशाचा आनंद लुटू.

समाद, पक्षी, माकड, काळवीट आणि वानर या साऱ्यांनीच मिळून हिरवळीत पहुडायचं आणि उन्हाचा मनसोक्त आनंद घ्यायचा असं ठरवलं.

''आपण सगळे जिवंत आहोत याचं कारण
तिकडे तो सूर्य आहे ना, त्याच्यामुळेच, बरं का.
तुला माहीत आहे? प्राण्यांना सूर्य खूप आवडतो.''
वानर म्हणालं, ''जे थंड रक्ताचे प्राणी असतात ना,
त्यांना खूप जास्त सूर्यप्रकाशाची गरज असते.''
''आपण इथे सूर्यस्नान करू शकतोय, इंद्रधनुष्याचा आनंद
लुटू शकतोय. किती नशीबवान आहोत आपण सगळे,'' माकड म्हणालं.

ढग दाटून आले. आकाशात ढगांचा गडगडाट सुरू झाला. वादळ सुटलं. विजा चमकू लागल्या.

मग पाऊस सुरू झाला. समाद आणि त्याचे हे सगळे सवंगडी पावसात खेळू लागले, बागडू लागले. पाऊस संपल्यावर समाद आणि त्याच्या सवंगड्यांची रानातली वाटचाल सुरू झाली.

जवळच एका ओढ्याच्या काठी एक हत्ती उभा होता. समादच्या अंगावर सोंडेने पाण्याचा भलामोठा फवारा उडवून तो म्हणाला,

''पाण्यात खेळायला तर बघ किती मजा येते.''

तो ओढा ओलांडून समाद आणि त्याचे सवंगडी पलीकडे गेले.

ते एका भल्यामोठ्या नदीच्या दिशेने चालू लागले.

''अरे, ती पाहा एक मगर. ती तिच्या पिल्लाला खाऊन टाकणार



आहे की काय?'' समाद ओरडून म्हणाला.

''नाही, नाही. आम्ही आमच्या पिलांना असंच इकडून तिकडे अगदी नीट सांभाळून घेऊन जातो,'' ती मगर त्याला समजावत म्हणाली.

मग त्या मगरीने आपल्या पिल्लाला खाली ठेवलं. ''जा बाळा, त्या समादशी खेळ,'' ती पिल्लाला म्हणाली.

मग समाद आणि ते मगरीचं पिलू नदीच्या काठावर लपाछपी खेळले. त्यानंतर समादनं नदीच्या पाण्यात मस्तपैकी सूर मारला आणि रंगीबेरंगी माशांच्या सोबतीनं तो पोहू लागला.

मासे आनंदानं गाणं म्हणू लागले.

आम्ही खूश आहोत
पाऊस आलाय
नदी खळाळून वाहतेय
सूर्य चमकतोय
समाद पोहोतोय.

''या नदीचं एवढं मोठं विस्तीर्ण पात्र. मी कसा काय पोहून जाऊ?'' समाद म्हणाला.

''अरे त्यात काय? हा पाणघोडा आहे ना. हा तुला पाठीवर बसवून पलीकडे नेऊन सोडेल,'' एक मासा म्हणाला.

''पाणघोडा? म्हणजे काय असतं?''

''अरे, तुम्ही माणसं त्याला हिप्पो म्हणता.''

मग त्या हिप्पोच्या पाठीवर बसून समाद नदीतून पलीकडच्या काठावर निघाला. त्याच्यासोबत मासेसुद्धा निघाले.

''मला पकड पाहू. बघू तुला जमतंय का,'' झाडाझुडुपांमधून आवाज आला.

समादनं पाहिलं तर एक चित्ता विजेच्या चपळाईनं दौडत त्याच्या



जवळून निघून गेला.

“त्या झाडावरच्या घरापर्यंत कोण आधी पोचतंय बघू. चल समाद.

पळ माझ्याबरोबर.

पळायला खूप मजा येते हं.”

“पण मी जगातल्या सगळ्यात वेगवान प्राण्याशी शर्यत कशी लावू?” समाद म्हणाला.

समादनं चित्त्याच्या जवळ जाऊन त्याच्या अंगावरून हात फिरवला. “ओ! भलंमोठं मांजर असं असतं होय?” समाद म्हणाला.

समादकडे हसून बघत चित्ता म्हणाला, “ओ! समाद असा दिसतो होय?”

“चल, जा आणि रानाच्या राजाला भेट, त्याला प्रणाम कर. रानाचा राजा म्हणजे कोण बरं? सिंह. तो तुझीच वाट बघतोय.”

“या अरण्यात तुझं स्वागत असो!” सिंह भलीमोठी गर्जना करत म्हणाला.

समाद पळत सिंहापाशी गेला. त्यानं सिंहाला घट्ट मिठी मारली.

“तू आम्हांला भेटायला आलास ना, म्हणून आम्हांला सगळ्यांना खूप खूप आनंद झालाय, बरं का.”

“तुझ्यासाठी झाडावरती एक छानसं घर बांधून तयार आहे.

त्या घरात जा आणि भरपूर मजा कर.”

मग माकडानं आणि भल्यामोठ्या वानरानं मिळून समादला त्या झाडावरच्या घरात चढायला मदत केली.

“अरे वा! म्हणजे माझं दुसरं स्वप्नसुद्धा आता लवकरच पुरं होणार तर!” त्या झाडावरच्या घरात शिरत समाद म्हणाला.

“तुम्हा वटवाघळांना रात्री एवढ्या मिट्ट काळोखात कसं काय दिसतं?” समादनं एका वटवाघळाला विचारलं.

“अरे, आम्ही आमच्या डोळ्यांपेक्षा आमच्या कानांचा अधिक वापर करतो,” एक भलंमोठं वटवाघूळ समादला समजावून सांगत म्हणालं. “समाद, तू तुझे डोळे बंद कर बघू.”



समादनं डोळे बंद केले.

“आता सांग बरं, मी तुझ्या डावीकडे आहे, का उजवीकडे?”

समाद म्हणाला, “उजवीकडे.”

“अगदी बरोबर,” असं म्हणून ते वटवाघूळ तिथून उडून दुसऱ्या बाजूला गेलं. “आणि आता?”

“माझ्या डावीकडे.”

“बरोबर. मग आलं ना लक्षात?”

आम्हांला मुळी डोळ्यांनी बघायची.

मग माकड झाडावरच्या घरात आलं.

तिकडे आकाशात बघ, समाद. क्षितिजावर लक्षावधी तारे दिसतायत. ते सगळे बघ कसे गुण्यागोविंदाने, एकजुटीने राहतात.

“गुड नाईट, समाद,” असं म्हणून ते माकड निघून गेलं. थोड्याच वेळात समादला गाढझोप लागली. गरजच भासत नाही. आम्ही कानांचा वापर करतो.”

दुसरा दिवस उजाडला. समाद त्या रानातून आपल्या घरी परत जायला निघाला. सगळे प्राणी जमून त्याच्याभोवती फेर धरून नाचू लागले, गाऊ लागले.

आम्ही खूश आहोत.
सूर्य चमकत आहे.
गवत उगवत आहे.
ढग गोळा होत आहेत.
नदी वाहत आहे.
वारा वाहत आहे.
पण आम्ही दु:खी आहोत.
कारण समाद आम्हांला
सोडून चालला आहे.
अच्छा समाद, बाय समाद!

❖



नवं कोरं

# कांगारू देशीच्या गोष्टी

## चहा साखरेचा नाताळ

लेखक

**जेन जॉली / रॉबर्ट इंगपेन**

अनुवाद

**मालविका आमडेकर**

**किंमत** - ७०/-रु. । **पोस्टेज** - ३०/- रु.





## रेडिओ रेस्क्यू

लेखक

**जेन जॉली / रॉबर्ट इंगपेन**

अनुवाद

**मालविका आमडेकर**

**किंमत** - ७०/-रु. । **पोस्टेज** - ३०/- रु.

## रात्रीचे राक्षस

लेखक

**नीना पौलोस/चेरिल वेस्टनबर्ग**

अनुवाद

**मालविका आमडेकर**

**किंमत** - ७०/-रु. । **पोस्टेज** - ३०/- रु.






## नववर्षाची अनपेक्षित भेट!

लेखक

**ख्रिस्तोफर चेंग/दी वू**

अनुवाद

**मालविका आमडेकर**

**किंमत** - ७०/-रु. । **पोस्टेज** - ३०/- रु.



बालकथा

(‘दोस्ती’ या पुस्तकातून)

# चिमणी

माझ्या घराच्या खिडकीत न चुकता दररोज छोटीशी चिमणी येते. तिने माझ्याशी दोस्ती करावी असं मला वाटतं. ती चिवचिव करून वाकडी तिकडी मान करून परत माझ्याकडे पंख फडफडवत एकटक बघत बसते. तो एवढासा छोटासा जीव पण तिची मैत्री करायची धडपड मोठी. माझं तिच्याकडे मुळीच लक्ष नसतं. सकाळी शाळेत जायची गडबड, अनेक हजार विचार डोक्यात, चिंचा रामूच्या शेतातून चोरून कशा पाडायच्या? त्या पाडाला आलेल्या चिंचा पाहून तोंडाला पाणी सुटतंच. जाता जाता शीला, स्वाती यांना घेऊन मगच त्या शेतात काठी घेऊन जायचं. शीला धाडसी, त्यामुळे ती रामूचा डोळा चुकवून झाडावर चढून काठीने चिंचा खाली पाडेल व आम्ही त्या गोळा करू. तेवढ्यात आईचे उपदेशाचे बोल कानावर पडतात. ‘‘आवर लवकर, केस विंचरून घे, डबा, पाण्याची बाटली घेतली का? रस्ता नीट पार करून जा. मैत्रिणींच्या घोळक्यातून जाताना लक्ष रस्त्याकडे असू दे.’’

शाळेला आधीच उशीर झालेला असतो. केस अजून विंचरायचे बाकीच. आरशाकडे गडबडीने जाऊन केस विंचरून घेते. तेवढ्यात माझी वाट बघत बसलेली चिमणी भुर्रकन उडून छोटीशी चोच आरशावर मारत, शेपटी हलवत मधूनच माझ्याकडे बघत राहते. चिवचिव करून माझ्याशी गप्पा मारायचा प्रयत्न करते. माझं तिच्याकडे मुळीच लक्ष नसतं. कारण आज नावडता विषय – भूगोलाची तोंडी परीक्षा असते. भूगोल म्हटलं की पृथ्वीसारखं माझं डोकं गरगरायला लागतं. पृथ्वीचं मोजमाप, दिवस-रात्र,



लोकांची राहणी, कुठे हवा थंड, कुठे गरम, हे घेऊन काय करायचं? परमेश्‍वराने मनुष्यप्राण्यासाठी जरा हवेत बदल, सृष्टीत वेळोवेळी बदल आपल्या लेकरांच्या हितासाठीच केलेले आहेत. आपल्याला त्याच्या विरुद्ध जाऊन काय फायदा? पण मनुष्यप्राणी गप्प कसा बसेल? त्याची बुद्धी पाजळायलाच पाहिजे. मुलांचं डोकं गोंधळून टाकायचं, यातच मोठ्या लोकांची फुशारकी.

आईची हाक परत कानावर येते.

''तुला बाबा सोडतायत. आवर लवकर, नट्टापट्टा या वयात बरा नाही. अभ्यासात लक्ष दे.''

नेहमी आईला असं का वाटतं, मी नुसती आरशासमोर नटतच असते. माझ्या डोळ्यांसमोर किती प्रश्‍न, शाळा, अभ्यास, बाई, मैत्रिणी. हे सर्वच



विषय थैमान घालत असतात. प्रत्येकाला आई मुद्यानिशी बोलत असते. घरात ती एक जिवंत घड्याळ आहे. प्रत्येकाला वेळेचा टोला मारून कामाला पाठवणारं. तिच्या स्वभावाच्या विरुद्ध आमचे बाबा. शांत, स्थिर, गंभीर वृत्ती, समोरून कोणी चोर चोरी करून गेला तरी ते त्यांच्या पेपरमध्ये दंग.



दिवसभरात ते एक वाक्यच जेमतेम आईशी बोलत असतील. आई नसती तर घराची वाट लागली असती. घराला जिवंतपणा आहे तो फक्त आईमुळेच.

शाळेत गेल्यावर मैत्रिणींचा गराडा. ‘‘परीक्षेत हे येणारच, ते वाच, अमूक पान पाठ कर.’’ तेवढ्यात शाळेची घंटा होते. आमच्या तिसरीच्या वर्गात गेल्यावर थोड्याच वेळात बाईंनी येऊन तोंडी परीक्षा घ्यायला सुरुवात केली.

‘‘नंबर दहाऽ’’ बाईंनी पुकारा केला. भूगोलातले अनेक प्रश्न विचारले व मी अचूकपणाने त्यांची उत्तरं दिल्यामुळे माझं मलाच आश्चर्य वाटलं. हुश्श्यऽऽ म्हणून मी बेंचवर बसले. नेक्स्ट, नेक्स्ट म्हणून बाई पुकारत होत्या. माझं लक्ष तिकडे मुळीच नव्हतं. आज शनिवार. घरी जाणे, टीव्ही बघणे आणि मस्तपैकी ताणून देणे.

शाळा सुटली. आम्ही तिघी मैत्रिणी गडबडीने बाकीच्या मैत्रिणींची नजर चुकवून हळूच रामूच्या शेतात शिरलो. शीलाने गडबडीने फ्रॉक खोचला व सरसर खारीसारखी ती झाडावर चढली. काठीने झोडपून बऱ्याच चिंचा खाली पाडल्या. आम्ही दोघींनी पटापट गोळा करून प्लॅस्टिकच्या पिशवीत भरल्या. चिंचा पाहून आमचं भानच हरपलं. शनिवार-रविवारची मेजवानी झाली. आम्ही आमच्या चिंचा वाटून घेऊन आपापल्या घरी गेलो.





# चरित्र मालिका

## रा.वा.शेवडे गुरुजी

पोस्टेज प्रत्येकी - ३०/- रु.



     

    

    

| | |
|---|---|
| आचार्य गांगेय भीष्म | ९५/- रु. |
| अनाथांचा नाथ श्री एकनाथ | ९५/- रु. |
| बापूजींची अमर कहाणी | ९५/- रु. |
| बुद्धभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ९५/- रु. |
| जाणती राणी महाराणी ताराबाई | ९५/- रु. |
| करुणासागर ईश्वरचंद्र | ९५/- रु. |
| कृष्णसखी राजराणी मीराबाई | ९५/- रु. |
| महर्षी दयानंद सरस्वती | ९५/- रु. |
| ममतेची मूर्ती मदर तेरेसा | ९५/- रु. |
| मानवतेचा महान सेवक अब्राहम लिंकन | ९५/- रु. |
| नेताजी सुभाषचंद्र बोस | ९५/- रु. |
| पंडितजी | ९५/- रु. |
| राजा राममोहन राय | ९५/- रु. |
| रणरागिणी दुर्गाराणी | ९५/- रु. |
| सती साध्वी देवी अहिल्या | ९५/- रु. |
| शूरवीर महाराणा प्रताप | ९५/- रु. |
| स्वामी विवेकानंद | ९५/- रु. |
| स्वराज्यसेवक खंडो बल्लाळ | ९५/- रु. |
| विश्वकवी रविबाबू | ९५/- रु. |
| दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल | १२५/- रु. |
| जाणता राजा श्री शिवछत्रपती | १५०/- रु. |

   



मला कडकडून भूक लागली होती. घरी आल्याबरोबर दप्तर एका बाजूला टाकून पट्‌कन टेबलावर बसले. आईची वाट न बघता वाढून घेतलं.

आई : ''अगं, मी वाढते, दमाने जेव. जरा पण धीर नाही पोरीला.''

मी : ''आई, तुला त्रास कशाला? आता मी मोठी झाले आहे. मला वाढून घेता येतं गं.''

मी गडबडीने जेवून घेतलं व माझ्या खोलीत गेले. तिथे चिऊताई आरशासमोर बसल्या होत्या. तेवढ्यात एक गुबगुबीत चिमणा आला. दोघे मिळून आनंदाने नाचत आरशावर टोचा मारू लागले. थोड्याच वेळात काय बिनसलं माहीत नाही. चिमणी चिडून चिमण्यावर तुटून पडली. त्या दोघांच्या भांडणाचा कर्कश सूर मला झोपू देईना. मी त्यांना हुसकावलं. ते गच्चीत जाऊन परत भांडू लागले. मी उठले आणि मूठभर तांदूळ त्यांच्यासमोर टाकले व त्यांच्याकडे बघत चिंचा खाऊ लागले. भांडण लगेच थांबलं व ते आनंदाने दाणे टिपू लागले. फांदीवर बसलेला कावळापण खाली आला व तोही दाणे टिपू लागला. चिमणीला ते अजिबात पसंत पडलं नाही. ती त्या कावळ्यावर धावून गेली. मला एवढा राग आला. ही एवढीशी चिमणी, चार दाणे कावळ्याने खाल्ले तर काय झालं?

मी : ''कावळेदादा, मी तुला चपाती देते. तू एकटाच खा. या हावरट चिमणीला मी उद्या एक दाणापण देणार नाही.''

मी स्वयंपाकघरात जाऊन चतकोर भाकरीचा तुकडा आणला व लांब गच्चीच्या कठड्यावर बसलेल्या कावळ्याला दिला. कावळ्याने तिरपी नजर करून घाबरतच चिमणीकडे बघितलं. पण छे! चिऊताई मस्त दाणे टिपण्यात मग्न होत्या. कावळ्याने दोन टोचा त्या तुकड्यावर मारल्या. आपली चोच घासली व तुकडा घेऊन झाडावर जाऊन बसला. चिमणीपासून दूरच. त्या भांडखोर चिमणीशी कोण वैर पत्करणार, नाहीतरी चिऊताई फारच स्वार्थी झाली आहे.

आज रविवार, आरामाचा दिवस. डोकं धुऊन गच्चीत आले, तर दोन चिमण्यांऐवजी सात-आठ चिमण्या गोळा झालेल्या होत्या. त्यांच्या चिवचिवाटासमोर टीव्हीचा आवाज फिका पडला. मी मुद्दामच लक्ष द्यायचं नाही असं ठरवलं. तेवढ्यात मला वाटतं कालचीच चिमणी माझ्यासमोर येऊन चिवचिव करत उडत होती. माझं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत होती.



मी : ''चिऊताई, आज तुझा उपवास. मी तुला काही दाणे देणार नाही. एवढ्या सर्व मैत्रिणींना घेऊन आलीस? तुला फक्त तुझ्याच जातीच्या चिमण्यांना दाणे द्यायचे व कावळ्याला का नाही?''

थोडावेळ मी तिला तिष्ठतच ठेवलं. मग मलाच तिची दया आली. ती ढिम्मपणे तिथे बसून राहिली. मला काही सोडून जाईना. मी स्वयंपाकघरात जाऊन मूठभर तांदूळ आणले व कावळ्यासाठी भाकरीचा तुकडा. पहिले त्या हावरट चिमणीला दाणे टाकले. त्या सर्व चिमण्या त्यांच्यावर तुटून पडल्या. त्या दाणे खाण्यात रमल्या. कावळा त्यांच्याजवळच बसून भकरीचा तुकडा आरामात खात होता. आज त्याच्यावर त्या चिमण्यांचा हल्ला नव्हता. त्यांचं कावळ्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष होतं. आपला समूह, आपलं पोट याव्यतिरिक्त त्या चिमण्यांना कशाचीच पर्वा नव्हती. आता त्यांचं कावळ्याशी वैर नव्हतं. कारण त्यांच्या वाट्यातला तो आता वाटेकरी नव्हता. कावळा भाकरीचा तुकडा थोडा खाऊन त्यांच्याशी पंगा नको म्हणून झाडावर जाऊन बसला. आज त्याला निवांतपणे व शांतीने खाता आलं.

माझा आता हा रोजचाच कार्यक्रम झाला. दाणे टाकणं व त्यांचे रुसवेफुगवे बघणं. आता त्या चिमण्या माझ्या मैत्रिणी झाल्या. मला त्यांचं रूप लोभस वाटायला लागलं. पशुपक्षी व मनुष्यप्राणी हे सर्व आपली एक जमात करून राहतात. त्यात त्यांना कोणीच ढवळाढवळ केलेली आवडत नाही. आपली ही छोटीशी चिमणीच पाहा ना. कावळ्याला एकही आपल्यातला दाणा टिपू दिला नाही. जर सर्वांनी मिळून खाल्लं असतं तर त्यात जास्त गोडी राहिली असती नाही का?

**तात्पर्य : पशुपक्ष्यांमध्ये पण जाती-जमाती असतात व ते दुसऱ्याला आपल्या जमातीत घेत नाहीत. आपण जातभेद विसरून जगावे.**

**– मधुमती शिंदे**

❖

## बालकथा

*('जादूचं खीरपात्र आणि इतर कथा' या पुस्तकातून)*

# जादूचं खीरपात्र

गरीब बिचारी लीना आईबरोबर झोपडीत राहात असे. खूप-खूप गरीब होत्या त्या. एक दिवस तर काही म्हणजे काहीच नव्हते त्यांना खाण्यासाठी.

छोटी लीना भुकेने व्याकूळ होऊन गेली, जाऊन बसली जवळच्याच रानात. तिला रडूच आवरेना.

"काय झालं ग बाळा? का रडतेस अशी?" कुठूनतरी कुणाचातरी हळुवार आवाज आला.

प्रेमळ आवाजात एक आजीबाई विचारत होती. लीनाच्या केविलवाण्या रडण्याचे कारण तिला समजले. त्या दयाळू आजीबाईंनी



लीनाला एक जादूचे भांडे दिले आणि म्हणाली, ''हे बघ या जादूच्या पात्राला म्हणायचं, ''अरे अरे बुडकुल्या, मला खीर दे.'' मग तुला छानशी खीर भरपूर खायला मिळेल. पण लक्षात ठेव हं की भांडे भरल्याबरोबर ''थांब रे बुडकुल्या, थांब हं थांब'' असं त्याला सांगायचे. समजले?''

लीनाने उत्सुकतेने जादूच्या पात्राला सांगितले, ''अरे अरे बुडकुल्या, मला खीर दे.'' आणि काय गंमत! खरंच, छानशा खिरीने भांडे भरू लागले, तसे लीनाला आठवले. ती पटकन् म्हणाली, ''थांब रे बुडकुल्या, थांब हं थांब.''

भुकेल्या लीनाने चाटूनपुसून खीर खाल्ली.

धावतधावतच लीना घरी आईकडे आली. आईला सर्व हकीकत सांगून खिरीचे भांडे दाखवले आणि म्हणू लागली, ''अरे अरे बुडकुल्या, मला खीर दे.'' भांड्यातील खीर पाहून आई खूपच खूश झाली. माऊबाईनेही खीर खाल्ली. आईनेही पोटभर खाल्ली. ''थांब रे बुडकुल्या, थांब हं थांब'' म्हणताच खीर येणे थांबले.

आई आनंदाने हरखून गेली, ''आपली गरिबी संपली बाई.'' आता





रोज काम करून आल्यावर भूक लागली की -

'जादूच्या पात्राची पंगत। भरपेट खिरीची गंमत।

माऊपण नाही भुकी। सर्वच झाले सुखी।'

एकदा काय झालं, लीना गेली होती बागेत खेळायला. तिला परत यायला वेळ झाला. इकडे आईला तर भूक लागली होती. तिने जादूचे पात्र घेतले व म्हणू लागली, ''अरे अरे बुडकुल्या मला खीर दे.'' आईने माऊला ताटलीत खीर दिली व स्वत:ही घेऊन खाऊ लागली. खाताखाता ती भांड्याला जादू थांबवायला सांगणे विसरून गेली.

इकडे भांडे खिरीने भरू लागले... भरू लागले, इतके की ऊतू जाऊ लागले. ते पाहून आई गडबडली, गोंधळली. भांड्याला थांब कसे सांगायचे तेच विसरून गेली.

भांडे भरून गेले, खीर ऊतू जात राहिली. जमिनीवर सांडू लागली, वाहू लागली. इतकी की त्यांचे छोटेसे घर भरून गेले, तरीही भांड्यातून खीर येतच राहिली. आता खीर आणखीच पसरू लागली. घराघरांमधून, रस्त्यारस्त्यांवरून वाहू लागली. खीर काही थांबेना. लोकांची त्रेधा उडाली. आई घाबरून गेली, ''अरे कुणी मदत करा रे, ही जादू थांबवा रे.''

त्याच वेळी लीना बागेतून परत निघाली होती. बाऽपरे, हा काय गोंधळ? त्या खीरभरल्या रस्त्यावरून तिची आई तिलाच शोधत, आरडाओरडा करत येत होती.

लीनाच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. तिने तिथूनच ''थांब रे बुडकुल्या, थांब हं थांब'' म्हणून त्या जादूच्या पात्राची विनवणी केली आणि हुश्श-सरतेशेवटी खिरीचा लोट थांबला एकदाचा!

सगळ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. हा ऽऽ आपलं गाव बुडता बुडता वाचलं! पण सांभाळा हं! चुकून त्या गावाला गेलात तर... तर... खीर खीऽऽऽर खीरच खीर!

**अरुंधती पंडित**

❖



नवं कोरं

# गरुडजन्माची कथा

त्रिमूर्तींच्या आगळ्यावेगळ्या कथा




लेखक
**सुधा मूर्ती**

अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत : १८०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

ब्रह्मदेवाला कोणे एके काळी पाच मस्तकं होती हे तुम्हास माहीत आहे का? भगवान शंकराने आपल्या जटांमध्ये चंद्रकोर का धारण केली आहे, याबद्दल तुम्हाला काही ठाऊक आहे का? देव इतरांची फसवणूक करतात का? आपणा सर्वांना एक गोष्ट निश्चित माहीत आहे– ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींचं चराचरात अस्तित्व असून, हे जग आणि आपली मानवजात अस्तित्वात आहे, ती केवळ त्यांच्यामुळेच. संपूर्ण भारतात सगळीकडे या तीनही देवतांची उपासना केली जाते; परंतु या देवतांबद्दलच्या अनेक सुरस आणि चमत्कृतिजन्य कथा अजूनही फारशा कुणाला माहीत नसतात. अनेक पुरस्कारविजेत्या लेखिका सुधा मूर्ती या वाचकांना हाताला धरून या अनोख्या, अज्ञात प्रदेशात घेऊन जातात. प्राचीन युगातील या तीन अत्यंत शक्तिशाली देवतांविषयीच्या अद्भुतरम्य कथा त्या वाचकांसमोर उलगडतात. कथासंग्रहातील प्रत्येक कथा तुम्हा सर्वांना एका वेगळ्याच मंतरलेल्या विश्वात घेऊन जाईल. त्या कथा ज्या कालखंडात घडतात, तेव्हाच्या व्यक्ती मनोवेगाने दूरदूरच्या प्रदेशात भ्रमंती करू शकतात, यातले प्राणी उडू शकतात आणि यात पुनर्जन्म तर नेहमीच होत असतात.





*(‘फ्रँकलिन’ या मालिकेतून)*

# फ्रँकलिन
## आणि पाळीव प्राणी

फ्रँकलिनला बे चा पाढा म्हणता यायचा आणि बुटांची नाडी बांधता यायची. त्याच्या लहानश्या, अंधाऱ्या कवचाच्या आत एकटं झोपता यायचं. एक अस्वल त्याचा खास दोस्तही होता. पण तरीही फ्रँकलिनला आणखी काहीतरी हवं होतं. त्याला एक प्राणी पाळायचा होता.

फ्रँकलिनची लहानपणापासून एक प्राणी पाळायची इच्छा होती. ‘‘एक प्राणी पाळू का?’’ असं त्यानं कधीही विचारलं, की त्याचे आई-बाबा म्हणायचे, ‘‘बघू नंतर कधीतरी.’’

फ्रँकलिननं खूप वाट पाहिली. तो त्याच्याकडे पाळीव प्राणी असल्याचं ढोंग करायचा. त्याच्या सॅम नावाच्या कापडी कुत्र्याला फिरायला न्यायचा. सॅमला त्यानं करामती शिकवल्या. त्याला त्यानं हाडं मातीत लपवायलाही शिकवलं. पण सॅम काही खराखुरा पाळीव प्राणी नव्हता.

एके दिवशी फ्रँकलिननं आई-बाबांना पुन्हा एकदा विचारलं, ‘‘मी एक प्राणी पाळू का, प्लीज?’’ फ्रँकलिनच्या आई-बाबांनी एकमेकांकडे पाहिलं.

‘‘आम्ही जरा विचार करून बघतो,’’ त्यांनी त्याला उत्तर दिलं.

या वेळी निदान ते ‘नाही’ तरी म्हणाले नव्हते, त्यामुळे त्याला आनंद झाला. पण नंतर त्याला काळजी वाटायला लागली. कारण त्याचे आई-बाबा विचार करण्यात दिवसच्या दिवस घालवायचे.

त्या दिवशी फ्रँकलिन अस्वलाच्या घरी गेला. त्यानं त्याला आपल्याला प्राणी पाळायची इच्छा आहे असं सांगितलं. ‘‘मी जर प्राणी



पाळला असता, तर मी एखादा पक्षी पाळला असता,'' अस्वल म्हणालं.

''का बरं?'' फ्रँकलिननं विचारलं.

''कारण पक्षी गोड गोड गाणी गातात,'' अस्वल म्हणालं.

''पक्षी छान असतात,'' फ्रँकलिन म्हणाला. ''पण त्यांच्या मोठ्या आवाजातल्या गाण्यामुळे भल्या पहाटे माझी झोपमोड होते.''

फ्रँकलिननं सकाळ होईपर्यंत धीर धरला. त्यानं आई-बाबांना विचारलं की त्यांचा विचार करून झालाय की नाही. ''अजून नाही,'' आई म्हणाली, ''तू त्या पाळलेल्या प्राण्याची नीट काळजी घेशील अशी आमची खात्री पटायला हवी.'' फ्रँकलिननं वरपासून खालपर्यंत मान हलवली.

''तू तुझ्या पाळलेल्या प्राण्याला नीट खायला-प्यायला घालशील?'' फ्रँकलिनच्या बाबांनी विचारलं.

फ्रँकलिननं पुन्हा एकदा मान हलवली. शंभरदा तरी 'प्लीज' म्हणावं असं त्याला वाटलं, पण त्यानं कसंबसं स्वत:ला आवरलं.

फ्रँकलिन बिव्हरला भेटायला गेला आणि त्यानं आपल्याला प्राणी पाळायची इच्छा असल्याचं तिला सांगितलं.

''मला जर प्राणी पाळायचा असता, तर मी एक मांजर पाळलं असतं,'' बिव्हर म्हणाली.

''का बरं?'' फ्रँकलिननं विचारलं.

''कारण मांजरं गुरगुर आवाज काढतात.'' ती म्हणाली.

''मांजरं असतात तशी छान,'' फ्रँकलिन म्हणाला, ''पण ती कुठे असतील, ते आपल्याला कधी माहीत नसतं.''

दुसऱ्या दिवशी फ्रँकलिननं त्याच्या आई-बाबांना विचारलं, ''तुमचा विचार करून झाला की नाही अजून?''

''नाही, अजून नाही.'' ते म्हणाले.

''प्लीज, लवकर ठरवा ना.'' फ्रँकलिन म्हणाला.

त्याच्या बाबांनी उसासा टाकला. ''फ्रँकलिन, हा महत्त्वाचा निर्णय आहे. पाळीव प्राणी घ्यायला आणि तो सांभाळायला बराच खर्चही येतो.''

फ्रँकलिननं त्याच्या पिगी बँकमधले सगळेच्या सगळे पैसे त्यांना देऊन टाकले. त्याला वाटलं ते पुरेसे होतील.



फ्रँकलिनचे पैसे मोजून झाल्यावर तो हंसीकडे गेला. त्यानं तिला सांगितलं की त्याला एक प्राणी पाळायचा आहे.

''मला प्राणी पाळायचा असता, तर मी एक ससुकलाच पाळला असता,'' हंसी म्हणाली. ''का बरं?'' फ्रँकलिननं विचारलं.

''कारण सशाच्या मिशा खूप छान हलत असतात.''

''ससे असतात गोंडस,'' फ्रँकलिन म्हणाला, ''पण मला वाटतं त्यांच्या मिशांमुळे मला शिंका येत राहतील.''

पुढचे तीन दिवस, आई-बाबा काहीतरी ठरवतील, याची वाट पाहून पाहून फ्रँकलिन कंटाळून गेला अगदी. त्याला एक बेत सुचला!

नाश्त्याच्या टेबलावर तो सॅमला घेऊन आला. ''मी खूप खूप दिवसांपासून सॅमची काळजी घेतोय,'' तो म्हणाला, ''मी खऱ्याखुऱ्या प्राण्याची पण अशीच काळजी घेईन. मी त्याला खायला घालीन. त्याचं घर स्वच्छ ठेवीन. तो आजारी पडला तर, त्याला प्राण्यांच्या डॉक्टरांकडेही घेऊन जाईन.''

फ्रँकलिनचे आई-बाबा हसले. ''याचा अर्थ तू बराच विचार करतोयस असं दिसतंय.'' ते म्हणाले.

''मग मी एक प्राणी पाळू का, प्लीज?'' त्यानं त्यांची मनधरणी करत विचारलं.

ते एकमेकांशी काहीतरी कुजबुजले. आणि मग त्यांनी आपल्या माना वर-खाली हलवल्या.

''अहाहा, थँक्यू,'' फ्रँकलिन म्हणाला. त्याला आत्ताच्या आत्ता प्राण्यांच्या दुकानात जायची घाई झाली होती.

''उद्या कुत्र्याचं एखादं पिल्लू निवडायला आम्ही तुला दुकानात घेऊन जाऊ,'' त्याचे बाबा म्हणाले.

''नको, नको,'' फ्रँकलिन म्हणाला, ''मला कुत्राबित्रा नको आहे.''

त्याचे आई-बाबा चकितच झाले.

''कुत्री गोड असतात तशी,'' फ्रँकलिन म्हणाला, ''पण मला एक शांत प्राणी हवा आहे.''

मग त्याला मांजरीचं पिल्लू हवं आहे का असं आईनं विचारलं.

''नको, नको,'' फ्रँकलिन म्हणाला, ''मांजरीची पिल्लंही गोंडस



असतात, पण मला माझ्या अगदी जवळ राहणारा प्राणी हवाय.''

''मग तुला हॅमस्टर हवा आहे का?'' फ्रँकलिनच्या बाबांनी विचारलं.

फ्रँकलिननं मान हलवली. ''नको.''

''एखादा ससा?'' फ्रँकलिनच्या आईनं विचारलं.

''नको, नको,'' फ्रँकलिन म्हणाला.

''मग तुला नेमका कोणता प्राणी पाळायचा आहे?'' त्याच्या आई-बाबांनी त्याला विचारलं.

फ्रँकलिन हसला आणि म्हणाला, ''मी तुम्हाला तो उद्या दाखवेन.''

प्राण्यांच्या दुकानात गेल्यावर फ्रँकलिननं माशाकडे बोट दाखवलं.

''मला गोल्डफिश हवा आहे,'' तो म्हणाला.

''गोल्डफिश?'' त्यांनी विचारलं. ''कशासाठी? मासा काही करामतीही करून दाखवत नाही आणि तो तुझ्याशी खेळूही शकणार नाही.''

मग फ्रँकलिननं त्यांना समजावून सांगितलं. मासे हळूहळू गोल पोहत असताना त्यांच्याकडे बघत राहायला त्याला खूप आवडतं. त्यांचे सुंदर सुंदर रंग त्याला आवडतात. त्यांच्याकडे पाहताना मनातल्या मनात जे काही वाटतं तेही फार आवडतं- शांत आणि छान.

''शिवाय,'' तो म्हणाला, ''मला गोल्डफिश फार आवडतो.''

''हा, हे कारण सगळ्यात छान आहे,'' फ्रँकलिनचे आई-बाबा म्हणाले.

फ्रँकलिननं त्याच्या माशाचं नाव ठेवलं गोल्डी. आई-बाबांना कबूल केल्याप्रमाणे तो तिची प्रेमानं काळजी घ्यायचा.

रोज सकाळी फ्रँकलिन गोल्डीला गोल गोल पोहताना पहात बसायचा. आणि रोज रात्री झोपायला जाण्यापूर्वी फ्रँकलिन एक मोठ्ठी पापी त्याच्याकडे फुंकरायचा. मग कुजबुजत्या आवाजात हळूच म्हणायचा, ''गोल्डी, मला तू खूऽऽप आवडतेस.''

**मूळ लेखिका - पोलेत बूर्ज्वा**

**अनुवाद - मंजूषा आमडेकर**

❖



बालकथा

('बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्य कथा' या पुस्तकातून)

# बुद्धिरामाचा न्याय

खूप वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सातवाहन राजे राज्य करीत. दयाळू, न्यायी आणि उदार म्हणून ते प्रसिद्ध होते. अशाच तिसऱ्या सातवाहनाच्या काळातली ही गोष्ट.

पैठण हे त्यांच्या राज्यातलं खूप भरभराटीला आलेलं मोठं व्यापारी शहर होतं. साऱ्या भारतातच नव्हे, तर जगभर तिथून व्यापार चालायचा. विशेषत: कपड्यांच्या व्यापारात पैठणचं नाव फार प्रसिद्ध होतं.

त्या ठिकाणी चार व्यापारी एकमेकांच्या सहकार्यानं एक दुकान चालवीत. नफ्याचे चार वाटे चौघांना घेऊन, पाचवा वाटा भविष्यकाळात उपयोगी पडण्यासाठी ते काढून ठेवीत. वर्षानंतर त्या पैशाची हिरे-माणकं वगैरे रत्नं घेऊन ठेवीत.

पण त्यांना चिंता होती की ते सारं धन ठेवायचं कुठं? त्यावर चौघांची मालकी होती. जरी ते एकत्र व्यापार करीत होते, तरी तसे एकमेकांवर विश्वास ठेवायला तयार नव्हते.

चौघांनी खूप विचार केला. अखेर त्यांना एक कल्पना सुचली. त्यांच्या पेठेच्या एका टोकाला एक गरीब ब्राह्मणी राहत होती. तिचं नाव राधाक्का. ती म्हातारी प्रामाणिक होती. तिला आपली संपत्ती सांभाळायला द्यायचा विचार चौघांनी केला. ती असल्या कटकटीत पडायला तयार नव्हती. परंतु चौघांनी परोपरीनं विनंती करून तिला तयार केलं. त्यासाठी तिला वर्षाला लागणारं धान्यधुन्य देण्याचं वचन दिलं. त्यांनी अगदीच गळ घातली, म्हणून राधाक्का



त्यांचं धन सांभाळायला तयार झाली.

अशी वर्षं जाऊ लागली. प्रत्येक वर्षी त्या रत्नांच्या संग्रहात भरच पडत असे. हे सारं त्यांनी एका पितळेच्या भांड्यात ठेवलं होतं. दरवर्षी ते मोजत आणि वाढ पाहून आनंदित होत.

अशी काही वर्षं गेल्यावर त्यांच्यापैकी एका भागीदाराच्या मनात पाप आलं. तिथं भांड्यात जमलेली रत्नं एका माणसाला सारं आयुष्य चैनीत काढायला भरपूर होती. त्यावर आपल्याला डल्ला कसा मारता येईल; याविषयी तो रात्रंदिवस विचार करू लागला आणि अचानक एकदा त्याला संधी मिळाली.

एके दिवशी चौघंही दुकानात बसले असता एक माणूस थंड ताक घेऊन जाताना त्यांनी पाहिला. उन्हाळ्याचे दिवस होते. सारखी तहान तहान होत होती. लुच्च्या भागीदाराच्या डोक्यात अचानक कल्पना आली.

तो म्हणाला,‘ मी म्हातारीकडे जाऊन ताक प्यायला भांडं आणतो.’ हा आपण होऊन काम करतोय म्हटल्यावर बाकीच्यांना बरंच वाटलं.

लुच्चा व्यापारी म्हातारीकडे गेला. त्यानं पिण्याचं भांडं मागण्याऐवजी रत्नांचं भांडं मागितलं. राधाक्का तशी बावळट नव्हती. तिनं त्याला एकट्याला ते भांडं देण्याचं नाकारलं.

तो म्हणाला, ‘‘हवं तर तुम्ही इथूनच बाकीच्यांना मोठ्यानं विचारा आणि

मग भांडं द्या.'' राधाक्का आपल्या ओट्यावर आली. तिनं ओरडून तिघांना विचारलं,''पितळी भांडं देऊ का?'' तिघांनी ओरडून होकार दिला. राधाक्कानं लुच्च्या भागीदाराकडे ते रत्नांचं भांडं दिलं.

त्याचवेळी इकडे दुकानात काही गिऱ्हाइकं आली आणि तीन भागीदार त्यांच्याशी व्यवहार करण्यात गुंतले. त्यामुळे लुच्च्याला आयती संधी मिळाली. त्यानं रत्नांचं भांडं घेतलं. त्वरित नगराबाहेर व दूरदेशी पळ काढला.

इकडे खूप वेळ घासाघीस करून, मोठा सौदा पटवून, ते तिघं व्यापारी मोकळे झाले, तेव्हा त्यांना ताकाची आठवण झाली. ताकवाला तोवर कंटाळून निघून गेला होता व भागीदार अद्याप आला नव्हता.

त्या दिवशी दुकान बंद होईतो भागीदार आला नाही. पण कुठं तरी कामाला गेला असेल, म्हणून त्यांनी दुर्लक्ष केलं.

पण दुसऱ्याही दिवशी भागीदार आला नाही, म्हणून त्यांना चिंता वाटू लागली. आपल्या हिश्शाचे पैसे टाकून गेला कसा, असं मनात येताच ते धावत आपली रत्नं पाहायला राधाक्काकडे आले.

काही क्षणांत सत्य कळताच त्यांनी म्हाताऱ्या राधाक्काला जबाबदार धरलं.

''आमचे पैसे तूच द्यायचे.'' त्यांनी तिला बजावलं. तिनं तसं करण्याला स्वच्छ नकार दिला.

अखेर व्यापाऱ्यांनी हे भांडण न्यायाधीशाकडे नेलं. तिथं त्यांनी आपली बाजू मांडली.

व्यापारी मोठे लोक होते. त्यांचा मानसन्मान अधिक होता. न्यायाधीशानं सरळ त्यांच्या बाजूनं निकाल दिला. आयुष्यभर खऱ्यानं व नेकीनं वागून म्हातारपणी असलं बालंट गळ्यात पडलं, म्हणून बिचाऱ्या राधाक्काला रडूच फुटलं.

न्यायाधीशानं काही मुदत दिली. अन्यथा तुरुंगात जावं लागेल, असं सांगून राधाक्कास सोडलं. बिचारी राधाक्का डोळ्यांतून अश्रू गाळीत, आपल्यालाच दोष लावीत घरी परतली.

राधाक्का घरी येत असता एका तरुणानं तिची ही दीनवाणी अवस्था पाहिली. त्यानं तिला विचारलं. राधाक्कानं सारी रडकथा सांगितली. त्या



सरळ म्हातारीची काही लबाडी नाही. व्यापाऱ्यांतला एक अधिक हुशार निघाला व त्यानं इतर तिघांना ठकवलं, हे त्या तरुणानं ओळखलं. मोठा हुशार आणि व्यवहारचतुर होता तो. त्यामुळे लोक त्याला बुद्धिराम म्हणूनच ओळखत.

राधाक्काची हकीकत ऐकून तो म्हणाला, 'असले मूर्ख अधिकारी गरीब प्रजेला छळतात. काळजी करू नका. मी बघतो.'

त्याचं हे वाक्य एका शिपायानं ऐकलं. बुद्धिरामाला राजद्रोही म्हणून राजापुढे उभं केलं. बुद्धिरामानं राजाला खरी खरी हकीकत सांगितली. राजानं त्यालाच योग्य न्याय करून दाखवण्याचा हुकूम केला.

बुद्धिरामानं राजाची आज्ञा मान्य केली व सर्व संबंधितांना दुसऱ्या दिवशी दरबारात बोलावण्यास सांगितलं.

दुसरा दिवस उजाडला. राजाचा दरबार गच्च भरला. सारे सरदार, मानकरी, राजाचे इतर अधिकारी आले. सावकार-व्यापारी आले. ही हकीकत समजली, ते सारे आले. दोन्हीही पक्ष दरबारात हजर झाले.

म्हाताऱ्या राधाक्कानं आपली सारी हकीकत सांगितली. राजासह साऱ्यांच्या लक्षात आलं, की म्हातारी काही बेईमान नाही. या चार लुच्च्यांतल्या एकानं अधिक हुशारी दाखवली. तिनं आपल्या परीनं पितळी भांडं द्यायला संमती विचारली होती. पण ठरावाप्रमाणं प्रत्यक्ष देताना चौघं

हजर नव्हते. एवढाच म्हातारीचा दोष होता.

सारं ऐकून बुद्धिरामानं निकाल दिला; आणि साऱ्या दरबारानं त्याच्या चातुर्याची मुक्तकंठानं तारीफ केली.

''म्हातारीनं रत्नांच्या भांड्याची जबाबदारी घेतली आहे. त्याप्रमाणे ते तिनं द्यायला हवं. पण तिघंच येऊन म्हातारीला दमदाटी करून, न्यायालयात नेऊन भांडं मागतात, ते अयोग्य.

तिघांनी आपल्या चौथ्या भागीदारास घेऊन येऊन ते भांडं म्हातारीकडून न्यावं. दरम्यान ठरावाप्रमाणे म्हातारीला लागणारं धान्यधुन्य व्यापाऱ्यांनी द्यावं. अन्यथा राजाचे अधिकारी व्यापाऱ्यांवर जप्ती आणून ते पैसे राधाक्कास देतील. चौथ्या भागीदाराला आणण्याची जबाबदारी राधाक्काची नसून उरलेल्या तिघांची आहे.

मधल्या काळात राधाक्काला दिलेल्या मनस्तापाची भरपाई म्हणून व्यापारी व चुकीचा न्याय देणारा न्यायाधीश यांनी पंचवीस सुवर्णनाणी देऊन म्हातारीच्या घराची दुरुस्ती करून द्यावी.''

बुद्धिरामाच्या न्यायबुद्धीची, नव्हे, त्याच्या चातुर्याची तारीफ जो तो करू लागला.

राजा सातवाहनानं तर त्यालाच आपला प्रमुख न्यायाधीश म्हणून नेमून टाकलं.

म्हातारी राधाक्का त्याला व राजाला मनापासून आशीर्वाद देत घरी गेली.

**– शरद दळवी**

❖





नवं कोरं

# गंमत कोडी
# भाग १ ते ५

लेखक

**घनश्याम देशमुख**

(५ पुस्तकांच्या एकत्रित
संचाची किंमत) २२५/-रु.
पोस्टेज - ५०/-रु.
















# एल्मर मालिका

लेखक - **डेव्हिड मॅकी**

अनुवाद - **डॉ. वृषाली पटवर्धन**

(५ पुस्तकांच्या एकत्रित
संचाची किंमत) ३००/-रु.
पोस्टेज - ५०/-रु.




**एल्मर**




**एल्मर आणि विल्बर**




**एल्मर आणि**
**अनोळखी पाहुणा मित्र**




**एल्मर आणि**
**हरवलेला टेडी**




**एल्मर आणि वारा**



बालकथा

*(विक्रम वेताळ मालिकेतील*
*'दैवी सिंहासन आणि इतर कथा' या पुस्तकातून)*

# सेनापतीची निवड

त्या रात्री स्मशानात मिट्ट काळोख पसरला होता. कधी फिदिफिदि हसण्याचा आवाज, तर कधी किंकाळ्यांनी तो परिसर दणाणून जात होता. एखाद्या शूरवीरालाही भीतीनं घाम फुटावा अशा त्या वातावरणात राजा विक्रम मात्र निधड्या छातीनं एकेक पाऊल पुढे टाकत होता. नेहमीच्याच जुनाट झाडावर उलट्या लटकणाऱ्या वेताळाला खांद्यावर टाकून तो परतीची वाट चालू लागला.

चकित होऊन वेताळ म्हणाला, ''राजा, पुन्हापुन्हा हे अवघड काम तू का करतो आहेस? जर काही न बोलता तू मला नेणार असलास, तरच मी येईन. नाहीतर निघून जाईन हे तुला चांगलंच माहीत आहे.''

राजानं होकारादाखल मान हलवली आणि तो चालू लागला. वेताळानं नवी गोष्ट सांगायला सुरुवात केली.

महिपाल हा वीरपूरचा राजा होता. त्याचा धर्मशील नावाचा एक हुशार प्रधान होता. कारभारातले महत्त्वाचे निर्णय राजा धर्मशीलच्या सल्ल्यानेच घेत असे. त्यामुळे सेनापतीची नेमणूक करण्याचं कामही राजानं धर्मशीलवरच सोपवलं होतं.

सैन्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी कुणीही सेनापती पदासाठी योग्य वाटत नसल्यामुळे धर्मशीलने बाहेरील उमेदवारांची परीक्षा घेण्याचं ठरवलं.

परीक्षेसाठी राजधानीत अनेक तरुण आले. त्या सर्वांच्या विविध युद्धकौशल्यांची परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमधून धर्मशीलनं दोन



तरुणांची निवड केली. दोघंही युद्धकौशल्यात निष्णात होते. पण सेनापतीपदासाठी एकाचीच निवड करणं आवश्यक असल्यामुळे धर्मशीलनं काही प्रश्न विचारून त्यांची पुन्हा परीक्षा घेण्याचं ठरवलं. दोघांनीही त्यासाठी संमती दर्शवली.

दुसऱ्या दिवशी दरबारात राजाच्या उपस्थितीत धर्मशीलनं त्या दोघांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. ''समजा तुम्ही शहरातल्या मुख्य रस्त्यानं जात असताना रस्त्यात दोन व्यक्ती मारामारी करताना दिसल्या, तर तुम्ही काय कराल?''

''महाराज, रस्त्यावर मारामारी करणं हा गुन्हा आहे. म्हणून सर्वप्रथम मी दोघांनाही पकडून तुरुंगात टाकेन. नंतर त्यांच्या मारामारीचं कारण विचारून घेऊन दोघांनाही शिक्षेसाठी दरबारात महाराजांसमोर हजर करेन.'' रूपसेननं उत्तर दिलं.

''ठीक आहे. सुशील, तुझं काय म्हणणं आहे?'' धर्मशीलनं दुसऱ्या तरुणाला विचारलं. ''महाराज, मारामारी झाली म्हणजे त्याला नक्कीच काहीतरी कारण असणार. त्यामुळे आधी मी मारामारीचं कारण समजावून घेऊन भांडण मिटवण्याचा प्रयत्न करेन आणि ज्याची चूक असेल त्यालाच तुरुंगात टाकेन.'' सुशीलचं उत्तर ऐकून दरबारातल्या अनेकांनी माना डोलावल्या. तेवढ्यात धर्मशीलनं दुसरा प्रश्न विचारला, ''समजा, राज्यातल्या काही लोकांचा गट राजाविरुद्ध बंडखोरी करत असेल, प्रजेला राजाविरुद्ध फितवत असेल तर तुम्ही काय कराल?''

''मी माझ्या गुप्तहेरांकडून अशा बंडखोरांची संपूर्ण माहिती घेईन. ते किती बलवान आहेत, त्यांच्याकडे किती आणि कोणती शस्त्र आहेत, त्यांना राज्यातल्या आणि राज्याबाहेरच्या किती लोकांचा पाठिंबा आहे, ही सर्व माहिती मिळवल्यावर मी त्यांच्यावर हल्ला करून त्यांना नष्ट करून टाकेन.'' रूपसेन म्हणाला.

सुशीलचं उत्तर थोडं वेगळं होतं. तो म्हणाला, ''महाराज, काही लोकांनी बंडखोरी करणं हे कारभारात काहीतरी उणीव राहिल्याचं लक्षण आहे. मी बंडखोरांशी बोलून त्यांच्याकडून कारण जाणून घेईन. जर त्यांचं कारण योग्य वाटलं, तर मी ते राजासमोर मांडेन. मात्र ते स्वत:च्या



फायद्यासाठी बंडखोरी करत असतील तर मात्र मी त्यांना कडक शिक्षा देईन.''

सुशीलच्या या उत्तरालाही दरबारातून चांगला प्रतिसाद मिळाला. धर्मशीलनं आता तिसरा प्रश्न विचारला, ''समजा तुम्ही राजाबरोबर शिकारीला गेला आहात आणि अचानक सिंहानं राजावर हल्ला केला तर तुम्ही काय कराल?''

''सर्वांत आधी राजाला सुरक्षित जागी हलवून मी स्वत: सिंहाचा सामना करेन. भले त्यासाठी माझा जीव गमावला तरी हरकत नाही.'' रूपसेननं तत्काळ उत्तर दिलं.

''तुझं काय म्हणणं आहे?'' धर्मशीलनं सुशीलला विचारलं.''

''जर मी महाराजांबरोबर असेन, तर हा प्रश्नच येणार नाही. कारण मी सदैव दक्ष असल्यामुळे सिंह महाराजांवर हल्ला करून शकणार नाही.'' सुशीलच्या या उत्तरावर सर्वांनी माना डोलावल्या. धर्मशीलही क्षणभर विचारात पडला. मग त्यानं त्याचा शेवटचा प्रश्न विचारायला सुरुवात केली. ''समजा आपल्या राज्याशेजारी तीन राज्यं आहेत. त्यातलं एक सोन्यानं समृद्ध आहे, एकात उत्कृष्ट शस्त्रसामग्री आहे आणि एकात भरपूर धान्य आहे. तुम्हाला तिन्ही राज्यांशी लढायचं आहे, तर त्यांपैकी कोणत्या राज्याशी तुम्ही आधी लढाल?''

''सेनापतीचं पहिलं कर्तव्य म्हणजे राजाची आज्ञा पाळणं. कोणत्या राज्याशी आधी लढावं हा निर्णय राजाचा आणि मंत्र्याचा असतो. त्यामुळे राजाच्या आज्ञेप्रमाणे मी लढाई सुरू करेन आणि जिंकेनही.'' रूपसेननं सांगितलं.

''सैन्य बळकट करणं हे सेनापतीचं पहिलं कर्तव्य आहे. त्यामुळे उत्तम शस्त्रं मिळवण्यासाठी मी शस्त्रसाठा असलेल्या राज्यावर आधी हल्ला करेन आणि सर्व शस्त्रं मिळवेन.'' सुशीलनं उत्तर दिलं. सुशीलचं हे उत्तरही सर्वांनाच पटलं.

धर्मशीलचे सर्व प्रश्न विचारून झाले होते. सेनापतिपदासाठी सुशीलची निवड होणार, हा अंदाज सर्वांना आला होता. धर्मशील आणि राजाचं याबद्दल बोलणं झाल्यानंतर मात्र राजानं अनपेक्षित निर्णय जाहीर केला. त्यानं



रूपसेनची सेनापती म्हणून निवड केली.

इथपर्यंतची गोष्ट सांगून वेताळ राजा विक्रमाला म्हणाला, ''सुशीलच्या सर्व उत्तरांवरून त्याची बुद्धिमत्ता उच्च दर्जाची आहे हे दिसून येत होतं. दरबारातही त्याच्या उत्तरांना मान्यता मिळत होती. त्याउलट रूपसेननं दिलेली उत्तरं सामान्य दर्जाची होती. स्वत: विचार करण्यापेक्षा राजाज्ञा पाळणं हेच त्याला योग्य वाटत होतं. मग हुशार सुशीलऐवजी कमी हुशार रूपसेनला सेनापती करण्याचं काय कारण असेल? जर तुला माझ्या प्रश्नाचं उत्तर माहीत असेल तर लवकर सांग. उत्तर माहीत असतानाही तू बोलला नाहीस, तर तुझ्या डोक्याची हजार शकलं होऊन तुझ्या पायावर पडतील, हे मात्र लक्षात ठेव.''

क्षणभर विचार करून राजा विक्रम म्हणाला, ''त्या दोघांपैकी सुशील जास्त हुशार होता हे कोणाच्याही लक्षात येण्यासारखं आहे. मात्र सेनापतिपदासाठी आवश्यक असणारा एक महत्त्वाचा गुण त्याच्याकडे नव्हता. राजाची आज्ञा पाळणं आणि सैन्याला प्रेरित करणं, हे सेनापतीचं कर्तव्य असतं. धोरणात्मक निर्णय घेणं हे राजाचं काम असतं. जर सेनापती स्वत:च धोरणात्मक निर्णय घेऊ लागला, तर काही निर्णय राजाच्या विरोधातही जाऊ शकतात. म्हणजेच सुशीलच्या हुशारीमुळे खुद्द राजालाही धोका होण्याची शक्यता होती. म्हणूनच राजानं कमी हुशार; पण आज्ञाधारक रूपसेनची सेनापतिपदासाठी निवड केली.''

राजाचं हे उत्तर ऐकून वेताळानं मान डोलावली. हसून तो म्हणाला, ''अगदी बरोबर! पण तू बोललास म्हणून आता मी चाललो... ही... ही... ही...!''

अंधारात झेप घेत क्षणात वेताळ अदृश्य झाला. शांतपणानं राजा विक्रम वेताळाला पुन्हा आणण्यासाठी स्मशानाच्या दिशेनं चालू लागला.

**– वैशाली कार्लेकर**

❖



## बालनाटिका

('गाणारा मुलूख' या पुस्तकातून)

# अजब दवंडीचा गजब नमुना

*ठणठणपूरचे महाराज चक्रमादित्य यांच्या सांगण्यावरून त्यांच्या राज्यात एक अजब दवंडी पिटली जाते, "उद्यापासून... या राज्यात... सर्व नागरिकांनी... गद्यात बोलणं बंद. सर्वांनी संगीतात बोलावं. संगीत गावं. जो कोणी गद्य बोलताना आढळेल त्याला प्रथम हत्तीच्या पायाखाली द्या. नंतर त्याचा कडेलोट करून शेवटी तोफेच्या तोंडी द्या आणि मग, पुन: अशी गोष्ट करणार नाही असं त्याच्याकडून लिहून घ्या." या दवंडीनंतर तिथे जी धमाल उडते त्याचा हा एक नमुना...*

(रंगमंचावर अंधारातून वेगवेगळे आवाज ऐकू येतात. सर्व आवाज बाजारातील आहेत. नवरा प्रवेश करतो. दुकानदाराला हाक मारतो.

**नवरा** : (गात) *दुकानदारवाले, अहो तुम्ही दुकानदारवाले*
*अन् मीठ कसे हो दिले?*

**दुकानदार** : (गात) *रुपयास चार शेर! रावसाहेब, रुपयास चार शेर.*

**नवरा** : *द्या तर मजला दोनच शेर*
*नाहीना काही कचरा केर?–*
*द्यातर मग दोन शेर.*

**दुकानदार** : *माल आमुचा पांढराफेक–*
*मीठ पाहा हे स्वच्छ सुरेख.*

**नवरा** : *अन् तेल कसे हो दिले?*

**दुकानदार** : *रुपये चार पडतील, लिटरला रुपये चार पडतील.*

**नवरा** : *द्या तर मग ते एक लिटर*
*नको बाकीचे सटरफटर.*

**दुकानदार** : *बिल जाहले साडेचार– बील जाहले साडेचार.*

**नवरा** : *तर मग बाकी नाही फार*
*मांडून ठेवा आज उधार.*

**दुकानदार** : (खवळून)–
*नाही नाही, नाही नाही, नाही चालणार*
*आज रोख अन् उद्या उधार*



**नवरा** : (चिडून) *चालणार नाही कशी? डॅम्बीस माणूस ऽऽ*

**दुकानदार** : *डॅम्बीस कुणाला म्हणतोस?... हलकट.*

**नवरा** : *मर्कट.*

**दुकानदार** : *पाजी.*

**नवरा** : *लुच्चा.*
(दोघेही गुद्दागुद्दीवर येतात)

**दोघे दूत** : (धावत)...
*भांडू नका, भांडू नका, भांडू नका*
*प्राणास बाबांनो मुकाल फुका*



**नवरा** : *भांडतो हा भांडतो*
*उधारी नच मांडतो*

**दुकानदार** : *नाही नाही, नाही नाही काही चालणार*
*आज रोख अन् उद्या उधार*

**दोघे दूत** : (श्लोकाच्या चालीवर) *नसे भांडण्यात या काहीच अर्थ–*

**सगळे** : *जय जय रघुवीर समर्थ*
(दुकानदार व नवरा दोघेही अद्वातद्वा बोलत दोन दिशेने जातात)

**दोघे दूत** : (मघाची नक्कल करीत) *डॅम्बीस*

**दुसरा** : हलकट–

**पहिला** : (तार स्वरात) *पाजी*

**दुसरा** : (खर्जात) *लुच्चा.*
(दोघेही हसतात.)

**पहिला** : छे छे! आता मात्र अगदी पोट दुखायला लागलं. कहर आहे. पुरे झालं बुवा. आता आणखीन् जरा हिंडलो ना तर डोकं फिरून जाईल. हे असं आणखी चार दिवस ऐकलं तर तंबोऱ्याचा भोपळाच काय, भोपळ्याची भाजी खाणं देखील बंद आपलं.

**दुसरा** : पण काय रे, इथं हा एवढा प्रकार, तर राजवाड्यात काय चाललं असेल?

**पहिला** : राजवाड्यात? तिथं तर नुसता दंगा उसळलाय. इथं साधं गाणं तरी चालतंय. तिथं शास्त्रोक्त संगीताशिवाय बात नाही. अष्टौप्रहर आ ऽ ऽ ऊ ऽ ऽ, आ ऽ ऽ ऊ ऽ ऽ

**दुसरा** : असं? मग पाहिलीच पाहिजे गंमत. चल, जायचं का तिकडं

**पहिला** : चल पाहिजे असेल तर– (दोघेही जातात)

**– द. मा. मिरासदार**

**नवं कोरं**



## शिकारी बनला शिकार

लेखक
**मोहम्मद उमर**

अनुवाद
**लीना सोहोनी**

**किंमत : ७०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

एक शिकारी मनात एक योजना आखून ती पार पाडण्यासाठी जवळच्या रानात जातो. त्या रानातल्या प्राण्यांची शिकार करून अख्ख्या रानावर राज्य करायचं, अशी ती योजना असते. आपली ही योजना नक्कीच यशस्वी होणार, आपण ठरवलेल्या बेताप्रमाणेच सर्व काही घडणार, असा त्याला जबरदस्त आत्मविश्वास असतो. आता आपली योजना यशस्वी झालेली असून सगळ्या प्राण्यांवर आपण ताबा मिळवलेला आहे असा त्याचा समज झालेला असतानाच त्याला माकड आणि गोरिला एक अनपेक्षित धक्का देतात. काय केलं असेल त्या दोघांनी?





# मारू बेडूक उडी
# गड्यांनो घालू या लंगडी...

शान्ताबाईंच्या भावगीतांतून विविध भावरंगी विश्व आपण अनुभवलं. शान्ताबाईंनी जी बालगीतं लिहिली त्या बालगीतांमधून उलगडणाऱ्या मोहक बालविश्वाची सफर आपण आता करणार आहोत. या गीतांमध्ये दादाबद्दलची तक्रार आहे, बाहुलीला गायलेली अंगाई आहे, स्वप्नरंजन आहे, दमदाटी आहे, प्राणिप्रेम आहे, पावसाचं वर्णन आहे, खेळात रमणारं मन आहे, विनोदही आहे. बालांच्या अशा वेगवेगळ्या मूड्‌समध्ये रंगू यात.

ही एक चिमुरडी आपल्या दादाची तक्रार आईकडे करते आहे. ती म्हणते-

*आई बघ ना कसा हा दादा*
*मला चिडवायचं हाच याचा धंदा*
*बाहुलीचं लग्न लावता आम्ही*
*म्हणतो 'नवरदेव आहे मी'*
*आता मलाच मुंडावळी बांधा*

दादा सारखा चिडवतो म्हणून आईकडे तक्रार करणारी ही चिमुरडी तो खोड्याही काय काय करतो तेही सांगते. बाहुलीच्या लग्नात मधेच घुसून नवरदेव होऊ पाहतो आणि मुंडावळ्या बांधायला सांगतो.

आणि बाहुलीच्या लग्नात एखाद्या वेळेला अशीही मजा होते. विहीणबाई (बाहुल्याची आई) सगळा खाऊच खाऊन टाकतात. मग दुसऱ्या विहीणबाई (बाहुलीची आई) त्यांना म्हणतात-

*विहीणबाई विहीणबाई उठा आता उठा*
*भातुकलीचा साऱ्या तुम्ही केला चट्टामट्टा*
*पसाभर शेंगदाणे, पसाभर गूळ*



*एकटीनं फस्त केलं, लागलं का खूळ?*
*खादाडखाऊ विहीण म्हणून सारी करती थट्टा*

तर बाहुलीच्या लग्नातला हा मजेदार प्रसंग आणि विहीणीविहीणींचं भांडण शान्ताबाईंनी या गीतातून छान रंगवलं आहे. त्या भांडणाला विनोदाची झालर आहे.

तर एकूणच बाहुली, तिचं लग्न, भातुकलीचा खेळ हा लहान मुलींच्या भावविश्वाचा एक अविभाज्य भाग एके काळी होता. त्यात लहान मुलगी आई असायची आणि बाहुली तिचं बाळ. मग आई त्या लहानगीशी जशी बोले, तसंच त्या लहानगीचं बाहुलीशी बोलणं असे. आई जशी अंगाई या छोटीसाठी गाते, तशीच अंगाई ही मुलगी बाहुलीसाठी गाते आहे. ती म्हणते-

*कर आता गाई गाई*
*तुला गाते मी अंगाई*
*आज माझ्या बाहुलीची*
*झोप कुणी नेली बाई*
*काम सारे उरकता*
*थकला ग माझा जीव*
*नको छळू तूही राणी*
*येऊ दे ना जरा कीव*

अगदी आपल्या आईसारखीच अंगाई ही चिमुरडी म्हणते, ‘झोप ना आता. तुझी झोप कुणी नेली?सगळी कामं करून माझा जीव थकला आहे. तू आता मला छळू नकोस. तुला जरा तरी दया येऊ दे माझी.’

आणि एका छोट्या मुलीचं स्वप्नरंजन आपल्याला एका प्रसन्न विश्वात घेऊन जातं. ती म्हणते-

*किलबिल किलबिल पक्षी बोलती*
*झुळझुळ झुळझुळ झरे वाहती*
*पानोपानी फुले उमलती*
*फुलपाखरे वर भिरभिरती*
*स्वप्नी आले काही*
*एक मी गाव पाहिला बाई*



जिथे पक्ष्यांचा किलबिलाट चालला आहे, झरे झुळझुळ वाहत आहेत, असं एक गाव या मुलीने स्वप्नात पाहिलं. या गावाची खासीयत सांगताना ती म्हणते-

*नाही पुस्तक नाही शाळा*
*हवे तेवढे खुशाल खेळा*
*उडो बागडो, पडो, धडपडो*
*लागत कोणा नाही*

या गावाची गंमत अशी आहे की, या गावात शाळा नाही, अभ्यासाची पुस्तकं नाहीत. आपल्याला पाहिजे तेवढं खेळायचं आणि कितीही पडलं, धडपडलं तरी कुणालाही लागत नाही, हे विशेष. एका छोट्या मुलीचं हे रम्य स्वप्न चितारणारं शान्ताबाईंचं हे सदाबहार बालगीत आहे. अर्थातच ते सदाबहार करण्यात संगीतकार श्रीनिवास खळे यांचं श्रेय आहेच.

लहान मुलांची भांडणं, मारामारी हा विषयसुद्धा शान्ताबाईंच्या बालगीतात येतो. आपल्या प्रतिस्पर्ध्यांना दम देणारा हा चिमुरडा म्हणतो -

*खोडी माझी काढाल तर*
*अशी मारीन फाइट*
*घटकेमध्ये विरून जाईल*
*सारी तुमची ऐट*

तो म्हणतोय,'बघा हं माझी खोडी काढाल तर! अशी एक फाइट मारीन की तुमची ऐट घटकेत विरून जाईल.' तो पुढे म्हणतो-

*अंगावरती याल तर*
*असा देइन ठोसा*
*कोपऱ्यात जाऊन तुम्ही*
*रडत बसा*

'माझ्या अंगावर याल, तर असा एक ठोसा लगावून देईन की, तुम्ही कोपऱ्यात जाऊन रडतच बसाल.' आहे की नाही सज्जड दम!

रंगीबेरंगी खेळण्यातला घोडा लहान मुलांसाठी पूर्वी आवर्जून घेतला जायचा. अर्थातच या घोड्यावर स्वार झालेल्या त्या मुलाला आपण खरोखरीच्या घोड्यावर बसलो आहोत, असं वाटायचं. अशाच घोड्यावर बसलेला हा चिमुकला घोडेस्वार म्हणतो आहे-



समस्त जीवित आणि नामशेष प्राणिसृष्टीतील प्राणी, पक्षी, जलचर आणि उभयचर प्राण्यांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेणारी चित्रमय सफर...

# 'आपली सृष्टी'

## १० पुस्तकांची मालिका

**प्राचार्य डॉ. किशोर पवार / प्रा. सौ. नलिनी पवार**



**किंमत**
**प्रत्येकी-११०/- रु**
**पोस्टेज**
**प्रत्येकी-३०/- रु**



जलसम्राट मासे
अजब सर्पसृष्टी
उभयचरांचे अनोखे विश्व
आकाशसम्राट पक्षी
पाणथळीतले पक्षी
मनोरंजक सस्तन प्राणी
डायनोसॉरचे अद्‌भुत विश्व
अनोखी मत्स्यसृष्टी
सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग
अनोखे सस्तन प्राणी












*टपटप टपटप टाकीत टापा*
*चाले माझा घोडा*
*पाठीवरती जीन मखमली*
*पायी रुपेरी तोडा*

माझ्या घोड्याची चाल कशी आहे, त्याच्या पाठीवरचं जीन मखमली आहे आणि पायातला तोडा रुपेरी आहे, याचं वर्णन तो करतो. या घोड्याच्या गुणांचं वर्णन करताना तो म्हणतो -

*घोडा माझा फार हुशार*
*पाठीवर मी होता स्वार*
*नुसता त्याला पुरे इशारा*
*कशास चाबूक ओढा*

माझा घोडा इतका हुशार आहे की, मी त्याच्या पाठीवर बसल्याबरोबर तो दौडायला लागतो. त्याला चाबकाची गरज पडत नाही.

तर स्वप्नामध्ये, खेळण्यांमध्ये रमणारं हे बालमन पावसातील निसर्गाचाही आस्वाद घेत असतं. पाऊस आल्यावर आनंदलेलं हे बालमन म्हणतंय-

*पाऊस आला वारा आला*
*पान लागले नाचू*
*थेंब टपोरे गोरे गोरे*
*भरभर गारा वेचू*

पावसाच्या येण्याने आणि त्याच्याबरोबर आलेल्या वाऱ्यामुळे झाडांची पानं जणू नाचायला लागली आहेत. पावसाच्या टपोऱ्या थेंबांसह पडणाऱ्या गारा वेचू या. हे पावसाळी वातावरण टिपताना या बालमनात शब्द

*गरगर गिरकी घेते झाड*
*धडधड वाजे दार कवाड*
*अंगणातही बघता बघता*
*पाणी लागे साचू* उमटतात-

पावसामुळे, वाऱ्यामुळे झाड गरगर गिरकी घेत आहे. दार धडाधड वाजतं आहे. अंगणात बघता बघता पाणी साचू लागलं आहे.

पावसाचं एक सुंदर शब्दचित्र या बालगीतातून उमटलं आहे. आणि



मुलांसाठी सगळ्यात आनंदाची सुट्टी असते मे महिन्याची. वार्षिक परीक्षा संपलेली असते आणि नवीन इयत्तेत जाईपर्यंत तरी अभ्यासाचं झंझट नसतं. सुट्टीचा हा आनंद द्विगुणित करण्यासाठी हा मुलगा म्हणतो आहे-

*मारू बेडूक उडी*
*गड्यांनो घालू या लंगडी*
*लपाछपी खेळता*
*देऊ या झाडामागे दडी*

आता सुट्टी लागली. मस्त लंगडी, लपाछपी खेळू आणि बेडूकउड्या मारू. तो आणखी म्हणतो-

*सुट्टी लागली सरली शाळा*
*कोण पहाटे उठतो खुळा*
*'अभ्यासाला बसा' कुणी ना*
*ओरडती घडोघडी*

सुट्टीत आता पहाटे उठायला नको आणि सारखं सारखं 'अभ्यासाला बसा' असं कुणी ओरडणार नाही. तेव्हा गड्यांनो मस्त धमाल करू या, असं उत्स्फूर्त आवाहन या गीतातून केलं आहे. या आवाहनात संगीतरूपी चैतन्य आणलं आहे संगीतकार सी. रामचंद्र यांनी.

'खोडी माझी काढाल तर...' हे गीत योगेश खडीकर या त्या वेळच्या बाल गायकाने मीना खडीकर यांच्या संगीत दिग्दर्शनात गायलं आहे. या गीताचा अपवाद वगळता उपरोल्लेखित सगळी गीतं त्यावेळची बाल गायिका सुषमा श्रेष्ठ हिने गायली आहेत. सी. रामचंद्र आणि श्रीनिवास खळे या संगीतकारांच्या संगीत दिग्दर्शनात.

तेव्हा शान्ताबाईंच्या या बालगीतांतूनही त्यांच्या प्रतिभेचं अपूर्व दर्शन घडतं. त्यांच्या या गीतांमधील बालसुलभ भावना, त्या गीतांमधली लय, त्यांची शब्दयोजना आणि कल्पनाशक्ती हे सगळं अवर्णनीय आहे. त्यांची ही बालगीतं आजही तेवढीच ताजी, टवटवीत वाटतात. तर शान्ताबाईंच्या गीतांचा हा प्रवास इथेच थांबवू या. आपल्या मनात मात्र तो सदैव चालूच असतो. पुढच्या वेळी भेटू या अशाच एखाद्या प्रतिभावंत गीतकाराच्या गीतांसह!

**-अंजली पटवर्धन**

## स्मरण



# कुसुमाग्रज

गीतरचनेच्या अंगाने प्रकट होणारी बालगीते आणि शिशुगीते हा एक स्वतंत्र असा काव्याविष्कार फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. मराठी संतकवींनी आणि त्यानंतर पंडितकवींनी जी बालगीते लिहिली, ती मुख्यतः श्रीकृष्णाच्या अवखळ बाललीलांशी निगडित होती. भगवान श्रीकृष्णाच्या गोकुळातल्या लीला हाच विषय संतांनी विशेषकरून हाताळला होता. नामदेवांनी तर लहान मुलांची बोबडी भाषा सहज प्रकट करीत बालकवितेतली मौज अधोरेखित केली होती. संतांच्या या रचनेला अर्वाचीन कवींनी आपल्या बालगीतांमधून अधिक सशक्तपणे जोपासले, हे मात्र सत्यच आहे; कारण संतांची आणि पंडिती काव्याची, बालकवितेच्या अंगाने असे म्हणण्यापेक्षा कृष्णलीलांच्या अंगाने ही बालसुलभ भावना प्रकट करणारी रचना, कितीही लडिवाळपणे प्रगट झालेली असली तरी, हे बालविश्व म्हणावे तेवढे बालवाङ्मयात रुजले नाही. हे बालकवितेचे बीज मात्र खऱ्या अर्थाने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तर चरणात रुजले आणि विसाव्या शतकात खऱ्या अर्थाने जोपासले गेले. लहान मुलांसाठी लिहिले गेलेले बालगीत आणि नात्यासंबंधी लिहिले गेलेले गीत यात थोडा फरक आहे. लहान मुलांचे संवेदनक्षम कुतूहल, नैसर्गिक अनुकरण करण्याची प्रवृत्ती, प्रचंड बालसुलभ कल्पनाशक्ती, त्यांचे चिमुकले भावविश्व खऱ्या अर्थाने जोपासले गेले ते अर्वाचीन



कवींकडून. ही शब्दचित्रे, रंगीबेरंगी दुनिया चितारणे हे तर काहीसे कठीणच; परंतु हे बालगीत लेखन एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी खऱ्या अर्थाने उमलून आले आणि त्याची वाढही विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून खरी व्हायला सुरुवात झाली.

कुसुमाग्रजांनी ‘बालबोधमेवा’ या नियतकालिकातून जो बालकवितेचा आविष्कार प्रकट केला तो थक्क करून टाकणारा होता. कुसुमाग्रजांचा हा बालकवितेचा आविष्कार ‘बालबोधमेव्यातील कुसुमाग्रज’ या छोटेखानी बालकवितांच्या पुस्तकात प्रथम प्रकट झाला. १९२९ ते १९३६ या सात वर्षांतल्या कविता ज्या पुस्तकात आहेत त्या मुलांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. मराठी भाषेला ‘ज्ञानपीठ पुरस्कार’ हा अत्यंत मानाचा आणि अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळवून देणारे कुसुमाग्रज हे बालविश्वात कसे रमले, हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वयाच्या सोळाव्या-सतराव्या वर्षी कुसुमाग्रजांच्या कविता लेखनाला जी सुरुवात झाली, तीसुद्धा एका अप्रतिम बालकवितेने आणि ती ‘बालबोधमेव्यात’ प्रथम प्रसिद्ध झाली, सप्टेंबर १९२९ या शुभ मुहूर्तावर. कवितेचे नाव होते ‘खेळायला जाऊ चला’. हे मूलतः मुलांसाठी लिहिलेले गीतकाव्य आहे...

*सकाळ झाली सूर्य आला*
*खेळायला जाऊ चला...*
*ऊन कोवळे, पिवळे पिवळे*
*हिरवाळीच्या मोत्यांना, रंगविते ते बघु या ना....*
*आपण बाल, सूर्यहि बाल*
*खेळू जोवर बाल खरे, मोठा होता खेळ सरे...*
*नीळ नदीच्या, गर्द तिराच्या*
*राईमध्ये राव कुणी, किंकर काही काळ कोणी....*
*स्वच्छंदाने, आनंदाने*
*कडेवरती आईच्या, गुडघ्यावरती बाबांच्या...*
*हळूच इकडे, हळूच तिकडे*



*खेळ खेळती जशी मुले, झाडावरती तशी फुले...*
*आपण बाल, फुलेही बाल*
*मुलाफुलांचा खेळ आता, खेळायला जाऊ चला...*

कुसुमाग्रजांच्या एकूणच कविताविश्वाचा वेध घेताना, १९३३मध्ये प्रसिद्ध झालेला 'जीवनलहरी' हा कवितासंग्रह अग्रक्रमाने उल्लेखिला जातो. वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी कवितासंग्रह प्रसिद्ध होण्याचे भाग्य ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कुसुमाग्रजांना लाभले होते. 'जीवनलहरी' (१९३३) ते 'मारवा' (१९९९) असे त्यांचे एकूण चौदा कवितासंग्रह प्रसिद्ध झाले; परंतु बालकवितांचे लेखन करणारे कुसुमाग्रज काहींसे अज्ञातच राहिले. तरीही 'बालबोधमेवातील कुसुमाग्रज' (१९८९) आणि 'श्रावण' (१९८५) हे दोन बालकवितांचे संग्रह प्रसिद्ध झाले आणि त्यातून कुसुमाग्रजांची बालकविता फुलातल्या गंधासारखी उमलून आली आणि हा कवितागंध सर्वत्र दरवळत राहिला. या दोन बालकविता संग्रंहामुळे कुसुमाग्रजांच्या एकूण पंचेचाळीस कविता रसिक वाचकांना उपलब्ध झाल्या, हे रसिकांचे परम भाग्य... कुसुमाग्रजांची एकूणच कवितासृष्टी अनुभवताना हे प्रकर्षाने जाणवते की, त्यांच्या कवितेत नाट्य जसे आहे तसे त्यांची सर्वच नाटके पाहताना वा वाचताना हे उत्कटपणे जाणवते की, त्यांच्या नाटकांत काव्यात्म भाषा शिगोशिग भरलेली आहे. त्यांची बालकविता वाचतानासुद्धा त्यातली बालसुलभ नाट्यमयता आणि लहान मुलांच्या निष्पाप मनाला स्पर्श करणारी काव्यात्मता आणि नादवलयतासुद्धा तेवढीच मोहवते. प्रौढरसिकांना त्यांची बालकविता खिळवून ठेवते. नाट्यमयता आणि आईपणाची जाणीव पक्ष्यांमध्येसुद्धा आहे ह्याचे अप्रतिम भान देणारी कुसुमाग्रजांची 'उठा उठा चिऊताई' ही सर्वोत्तम बालकविता 'बोलबोधमेव्याच्या' (एप्रिल १९३५) अंकात प्रसिद्ध झाली होती. आज ऐंशीहून अधिक वर्षे उलटली. आजही ही बालकविता वाचताना मनाला भिडते एवढी जबरदस्त ताकद ह्या कवितेत आहे. विशेषत: कवितेच्या शेवटच्या कडव्याशी जे नाट्य गुंफले आहे, ते तर



## शकुन्तला फडणीस
### यांचे बालसाहित्य




# आजीचा धडा
## आणि इतर कथा




# पत्राचा प्रवास
## आणि इतर कथा




# पैज जिंकली छोट्यानं
## आणि इतर कथा

**३ पुस्तकांच्या एकत्रित**
**संचाची किंमत १८०/- । पोस्टेज - ५०/-**



काळजाला भिडणारे आहे.

*उठा उठा चिऊताई, सारीकडे उजाडले*
*डोळे तरी मिटलेले, अजुनही...*
*सोनेरी हे दूत आले, घरट्याच्या दारापाशी*
*डोळ्यावर झोप कशी अजुनही...*
*लगबग पाखरें ही, गात गात गोड गाणे*
*टिपतात बघा दाणे चोहीकडे...*
*झोपलेल्या अशा तुम्ही, आणायचे मग कोणी*
*बाळासाठी चारापाणी, चिमुकल्या...*
*बाळाचे नि घेता नाव, जागी झाली चिऊताई*
*उठोनिया दूर जाई, भुरभुर...*

अर्वाचीन कवींमध्ये कुसुमाग्रज हे तेजस्वी ताऱ्यासारखे तेजाळत राहणारे नाव आहे. ह्या अर्वाचीन कवींमध्ये विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, इंदिरा संत, शान्ता शेळके, शंकर वैद्य यांच्यासारखे अनेक श्रेष्ठ कवी आहेत. प्रत्येकाने आपली स्वतंत्र नाममुद्रा ह्या कवितेच्या नभमंडळात ताऱ्यासारखी तेजाळत ठेवली हे तर सत्यच आहे; परंतु या श्रेष्ठ कवींमध्ये आकाशातल्या एका तेज:पुंज ताऱ्याला कुसुमाग्रजांचे नाव लाभले हे ह्या श्रेष्ठतम कवीचे आणि एकूणच काव्यविश्वामधल्या एका कुसुमाग्रजांचेच फक्त परमभाग्य म्हणावे लागेल. आकाशातल्या ताऱ्यांशी चांदण्या रात्री मनसोक्त हितगुज करणारे कुसुमाग्रज त्याच तारकांपैकी एक झाले आणि तेजाने चमकू लागले. आपल्या साहित्यिक जीवनाची सुरवातच मुळी कुसुमाग्रजांनी बालकविता लेखनाने केली, त्या कुसुमाग्रजांचे नाव मराठी काव्यविश्वात अमर पावले. १९३६साली प्रसिद्ध झालेल्या 'जाईचा कुंज' ह्या बालगीतसंग्रहात त्यांनी आपला बालकवितेविषयीचा दृष्टीकोन प्रकट करताना म्हटले होते, ''बालगोपाळांच्या अंत:करणात उद्भवणाऱ्या प्रेरणा, त्यांच्या मनात असणारे कुतूहल, त्यांच्या

मनोविश्वात घोळणारे उत्सुकतापूर्ण विषय आणि त्यांचं विश्व या गोष्टींनाच बालवाङ्मयात स्थान आहे...''

लयबद्धतेची अमृतवाहिनी असलेली कुसुमाग्रजांची बालकविता हा चिरंतन चिंतनाचा विषय आहे. लहान मुलांचे कल्पनाविश्व फुलवणारी कविता कुसुमाग्रजांनी लिहिली. बालांच्या मुखातूनच प्रकट व्हावी एवढी ताकद त्यांच्या बालकवितेत आहे. त्यांची 'कोकिळा' ही बालकविता बालमनाचे अप्रतिम दर्शन घडविते.

*आंब्याची राई, कोकिळाबाई*
*पानात लपून कुहू कुहू गाई...*
*कोकिळाबाई बाहेर डोकवा*
*मंजुळ गाणे, आम्हाला शिकवा...*
*कोकिळाबाई शाळेत या ना*
*कवितेचा तास, तुम्हीच घ्या ना...*

बालमन कुसुमाग्रजांनीच उलगडावे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'नाव' ही कविता.

*हा माझा सोबती*
*त्याचं नाव चंदू*
*हा माझा भाऊ*
*त्याचं नाव बिंदू...*
*ही माझी ताई*
*तिचं नाव जाई*
*ही माझी आई*
*तिला नावच नाही...*

प्रत्येक लहान मूल आपल्या प्राणप्रिय आईभोवतीच घोटाळत असते. आई हेच प्रत्येक मुलाचे खरे विश्व असते. त्याचे अप्रतिम चित्रण ह्या 'नाव' कवितेत आहे.



वृद्ध, समजूतदार आणि अत्यंत प्रेमळ आजोबा आणि त्यांचा प्राणप्रिय नातू हे नातं तर कुसुमाग्रजांनी अतिशय तरलपणे उलगडले आहे.

*सूर म्हणतो साथ दे, दिवा म्हणतो वात दे..*
*उन्हामधल्या म्हाताऱ्याला, फक्त तुझा हात दे...*
*आभाळ म्हणते सावली दे, जमीन म्हणते पाणी दे...*
*माळावरच्या म्हाताऱ्याला फक्त तुझी गाणी दे...*
*कावळा म्हणतो पंख दे, चिमणी म्हणते खोपा दे...*
*माझ्यासारख्या आजोबाला फक्त तुझा पापा दे...*

आई आणि तिचे प्राणप्रिय मूल हे जेवढे हळवे नाते आहे तेवढेच हळवे नाते आजी-आजोबा आणि त्यांची अत्यंत लाडकी नातवंडे यांचे असते. याचे उत्कट भान देणारी ही प्रस्तुतची कविता आहे. 'चिऊकाऊचे गाणे' या बालकवितेत तर कुसुमाग्रजांनी 'चिऊकाऊंचे' भावविश्वसुद्धा चितारले आहे.

*चिऊ काऊ, साऱ्या जाऊ*
*बाळाचे या दू दू पिऊ...*
*चिऊ काऊ, साऱ्या जाऊ...*
*बाळाचा या भात खाऊ...*
*चिऊ काऊ, साऱ्या जाऊ...*
*बाळाला या जू जू देऊ...*
*चिऊ काऊ, साऱ्या जाऊ...*
*बाळाला या गाणे गाऊ...*
*गाणे गाऊ, झोप लावू...*
*आणि पळोनिया जाऊ...*

बालगीतांमध्ये महत्त्वाचे काय असते तर त्याला लयबद्ध ताल हवा, अप्रतिम ठेका हवा, छंदसुद्धा हवा आणि मुख्य म्हणजे बालविश्व हळुवारपणे उलगडलेले हवे. बालगीते ही चित्रमयी भाषेत प्रगट होणे



**नवं कोरं**

# दोस्ती




**मधुमती शिंदे**

**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

कथेतील पात्रांच्या चित्रणातून पशू-पक्ष्यांच्या भावनांचा माणसांच्या स्वभावाशी मिळताजुळता वेध घेतला आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून साथ केली आहे. आपल्या अवतीभोवती अनेक पशू-पक्षी गुण्यागोविंदाने बागडताना दिसतात, पण उपद्रवी मनुष्यच त्यांचे जगणे-बागडणे एका क्षणात नष्ट करतो.

पक्ष्यांच्या सवयी आणि शरीराची रचना यावर त्याचे निवासस्थान अवलंबून असते. जसे, चिमणी धिटाईने वाळत घातलेले धान्य टिपते, कावळा मनुष्यवस्तीजवळच बिनधास्तपणे राहतो. प्रत्येक पशू-पक्ष्याच्या वागणुकीची एक तऱ्हा, एक लकब असते, असे या पुस्तकातून दिसून येते.

या कथांमधून प्राण्यांची जगण्यासाठी, जिवंत राहण्यासाठी चाललेली धडपड आणि कधी कधी हतबल होऊन जीवनासाठी चाललेला संघर्ष दिसून येतो. मुलांना पशू-पक्ष्यांविषयी जिज्ञासा, प्रेम वाटायला लावणारे हे पुस्तक आहे.

आवश्यक असते. हे महत्त्वाचे निकष, कुसुमाग्रजांनी आपल्या बालगीतांमधून तोलून धरलेले आहेत आणि म्हणूनच कुसुमाग्रजांची बालकविता काळाच्या कसोटीवर शाश्वतपणे उभी आहे. कुसुमाग्रज हे शतकांचे कवी तर होतेच. तसेच ते नाटककार होते. कादंबरी आणि कथा त्यांनी लिहिल्या. ललितलेख लिहिले. एकांकिका लिहिल्या. मुख्य म्हणजे त्यांनी 'जादूची होडी' आणि 'छोटे आणि मोठे' हे दोन बालकथासंग्रहसुद्धा प्रसिद्ध केले. लहान मुलांचे वाङ्मयीन पातळीवर भरण-पोषण व्हावे ही त्यांची भूमिका होती आणि त्यांनी लहान मुलांचे विश्व फार सुंदरपणे फुलवले, हे मात्र निश्चित.

**-वामन देशपांडे**
**९३२४६१५०७७**

## टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील. या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹१०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा आठ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५.

इतर कोणत्याही पुस्तकांवर २०टक्के सवलत मिळवा.



# तेनालीराम मालिका

लेखिका - मंजूषा आमडेकर

(१४ पुस्तकांच्या एकत्रित
संचाची किंमत) - ८४०/- रु.
पोस्टेज - ५०/-रु.





**बुद्धिमान तेनालीराम**
**जगावेगळा तेनालीराम**
**चतुर तेनालीराम**
**न्यायप्रिय तेनालीराम**
**समयसूचक तेनालीराम**
**लाडका तेनालीराम**
**प्रसंगावधानी तेनालीराम**
**निर्भय तेनालीराम**
**राज्याचे भूषण तेनालीराम**
**हजरजबाबी तेनालीराम**
**हुशार तेनालीराम**
**विनोदवीर तेनालीराम**
**मजेदार तेनालीराम**
**परोपकारी तेनालीराम**







बालचमूंसाठी
**चतुर आणि विनोदी तेनालीरामच्या**
धमाल गोष्टींचा खजिना



## अभिप्राय

# विज्ञानाशी करू या दोस्ती...




**विज्ञानातील गमती जमती**

**लेखक :** डी. एस. इटोकर

**पृष्ठसंख्या :** ९२

**किंमत :** ११०/- रु.



विज्ञान विश्वात सतत रंजक प्रयोग केले जात असतात. त्यांचा शैक्षणिक जीवनावर अधिक प्रभाव पडतो. अवघड विषयांच्या धास्तीने विद्यार्थी अभ्यासात मागे पडू नयेत म्हणून विज्ञानविषयक अभ्यासक्रमबाह्य पुस्तके मुलांनी वाचावीत म्हणून ‘विज्ञानातील गमती जमती’ हे पुस्तक डी.एस. इटोकर यांनी लिहिले आहे.

बाटलीतील कारंजे, परावर्तनाची गंमत, चुंबकीय खेळाडू, थर्मामीटरचे तत्त्व, गरम आणि थंड पाणी, गरगर फिरणारी बाटली या शीषकांवरूनच प्रस्तुत पुस्तकातील प्रयोगांचा अंदाज येतो. विज्ञानासारखा कठीण विषय या प्रयोगाद्वारे रंजक पद्धतीने समजतो. शास्त्रीय तत्त्वाने घडणाऱ्या घटनांची योग्य माहिती कळते. या मुलांमध्ये असलेले दडपण कमी करून त्यांना विज्ञान विषय सोपा वाटावा यासाठी प्रयत्न करणारे असेच हे पुस्तक म्हणावे लागेल.

यातील सर्व प्रयोग साधे, सोपे आणि स्वस्त आहेत. या माध्यमातून विज्ञान विषयाबाबत गोडी वाढू शकते. स्वनिर्मितीचा आनंद वेगळा असतो. शिवाय विद्यार्थ्यांमधील ताणतणाव कमी होऊन आत्मविश्वास वाढीसाठी उपयुक्त आहे. इतरांना हे प्रयोग जादूचे वाटतील इतके मजेदार आहेत. फावल्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी आणि ‘नेट’ प्रॅक्टिस टाळण्यासाठी विज्ञानाशी दोस्ती करणे केव्हाही उत्तम. टीव्हीसमोर तासन्तास ‘पोगो’ बघण्यापेक्षा अशी ही शैक्षणीक करमणूक केव्हाही चांगली असते, असे मुलांचे मानसतज्ज्ञ सांगतात.

खेळणी, वाचनातून विज्ञान, छंदातून विज्ञान अशा मालिकेतील हे एक पुस्तक सप्रेम भेट देण्यासारखे!

*– दैनिक सामना, १५-४-२०१८*



## बालनगरी

अनाथांचा नाथ

# ॥श्री एकनाथ॥

**रा.वा. शेवडे गुरुजी**




संत एकनाथजी एक दिवस पूजा करीत बसले होते. देवांना स्नान घालून, पुसून त्यांना ते देव्हाऱ्यात ठेवीत होते. प्रत्येक देवाला पुसताना ते त्याचे नाव घेत होते. इतक्यात कुणी एक पगडी घातलेला ब्राह्मण पायांतल्या वहाणांसकट त्यांच्या घराच्या दरवाजातून थेट देवघरात आला आणि कशाचाही विचार न करता तो त्यांच्या मांडीवर बसला. त्याच्याकडे पाहत त्याच्या पाठीवरून हात फिरवीत एकनाथजी म्हणाले, ''भल्या गृहस्था, केवढं हे माझ्यावरचं तुझं प्रेम? मला पाहताच पायातल्या वहाणा काढण्याचंसुद्धा तुला भान राहिलं नाही. तुला पाहून मला आनंद झाला.''

तो ब्राह्मण काही बोलला नाही. एकनाथांना राग येईल असे त्याला वाटले होते. एकनाथ चिडतील, अपशब्द बोलतील, अशी त्याची समजूत होती; पण यातले काहीच घडले नाही. एकनाथांनी तिथूनच आपल्या पत्नीला हाक मारली. गिरिजाबाई आत येऊन म्हणाल्या, ''का बरं आपण बोलावणं केलंत? आणि हे कोण आहेत इथं?''

''हे माझे परमभक्त सज्जन ब्राह्मण आहेत. फार दुरून आलेले दिसतात. यांना स्नानासाठी पाणी काढा. हे स्नान आटोपून आमच्याबरोबर भोजन करतील.''



"यावं महाराज." गिरिजाबाईंनी त्यांना स्नानगृहात पाठविले.

त्या ब्राह्मणाची अंघोळ झाल्यावर माडीवर अंमळ विश्रांती घेण्यास त्यांनी सांगितले. त्या ब्राह्मणाचा नाइलाज झाला.

पंगती मांडल्या गेल्या. एक ब्राह्मण पंगतीला आहे म्हणून सांडगे, पापड, कुरडया तळल्या गेल्या. पंगत बसली. एकनाथांच्या शेजारीच तो ब्राह्मण बसला. 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' झाले. एकनाथांनी भोजनास प्रारंभ केला; पण तो ब्राह्मण काही जेवणास प्रारंभ करीना. आग्रह करण्यासाठी गिरिजाबाई आल्या. वरण आणि तूप त्या ब्राह्मणाच्या पानावर वाढणार इतक्यात-

पुन्हा त्या ब्राह्मणाच्या अंगात भूत संचारले. तो पानावरून उठला तूप वाढताना ओणव्या झालेल्या गिरिजाबाईंच्या पाठीवर तो उडी मारून बसला. गिरिजाबाई किंचित हबकल्या. तत्काल एकनाथ म्हणाले, "गिरिजा, सांभाळ गं बाई, तुझ्या पाठीवरच्या ब्राह्मणाला."

"हो, हो. अवश्य सांभाळीन. माझा मुलगा हरिपंडित पाठीवर बसे. मला सवयच आहे त्याची."

एवढा भयंकर प्रसंग त्या ब्राह्मणाच्या हातून घडला असतानासुद्धा एकनाथांच्या मनाची शांती ढळली नाही. एकनाथांना क्रोध झाला नाही. तो ब्राह्मण गिरिजाबाईंच्या पाठीवरून उतरला आणि त्याने प्रथम गिरिजाबाईंचे पाय पकडले. तो म्हणाला, "माते, मला क्षमा कर."

"पण आपण असं का बरं केलंत?"

"रिकामं पोट माणसाला काहीही करवील." एकनाथांकडे वळून तो ब्राह्मण पुढे म्हणाला, "एकनाथ महाराज, आपण खरोखरच संत आहात. आपण प्रज्ञावान आहात."

"पण भल्या गृहस्था, तू असं का वागलास हे नाही सांगितलंस."

"मला दोनशे रुपयांची गरज होती. काही उपद्व्यापी मंडळींनी, 'काहीही करून एकनाथाला राग आण म्हणजे तुला दोनशे रुपये देतो,' असे सांगितले." त्या ब्राह्मणाचा कंठ दाटून आला. त्याच्या तोंडून पुढे शब्द उमटेना.

"बोला, थांबलात का?"

"आपणाला राग आला नाही. मग मला ते ब्राह्मण दोनशे रुपये देणार नाहीत आणि इतकं करून माझी गरज भागणार नाही."



"भल्या ब्राह्मणा, असा निराश होऊ नकोस. मी देतो तुला दोनशे रुपये."

एकनाथांच्या आज्ञेने उद्धवाने घरातून दोनशे रुपये आणून दिले. ते त्याच्या हातावर ठेवीत एकनाथजी म्हणाले, "हे घे दोनशे रुपये आणि भागव तुझी गरज - प्रथमच येऊन तू जर माझ्याकडे पैसे मागितले असतेस तर मी तुला त्वरित दिले असते. गरजू संसारी माणसांची दु:खं काय असतात, ते मी जाणतो."

पुन्हा एकनाथांच्या चरणांवर मस्तक ठेवून तो निघून गेला. हाच ब्राह्मण पुढे एकनाथांचा एक प्रचारक अनुयायी बनला.

❖

## आवाहन

पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८०० शब्दांत लिहून कळवा. अभि-प्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.**



**'मी, संपत पाल, गुलाबी साडीवाली रणरागिणी'** या पुस्तकाचं प्रकाशन नुकतंच करण्यात आलं. या प्रकाशन प्रसंगी या पुस्तकाच्या लेखिका संपत पाल यांच्यासह मेहता पब्लिशिंग हाऊसचे अखिल मेहता आणि संपादक योजना यादव. तसेच संपत पाल यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यालयाला भेट दिली, त्यावेळी सुनील मेहता आणि अखिल मेहता यांच्याबरोबर टिपलेली क्षणचित्रे.




गुंडेवाडी (ता. जालना) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत **मेहता पब्लिशिंग हाऊसच्या** वतीने विविध विषयांवरील बालसाहित्य नुकतेच भेट देण्यात आले. या पुस्तकांसमवेत या शाळेतील विद्यार्थी.

Postal Reg. No. PCW/086/2018 - 2020
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/05/2018 Posting Date : 11/05/2018

# आवर्जून वाचावे

## सर्पाचा सूड । हरवलेल्या मंदिराचे रहस्य
## थैलीभर गोष्टी । आजीच्या पोतडीतल्या गोष्टी




**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,